
# वार्षिकांक

सत्र २०१६-२०१७

# निर्धार











बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी नागपूर द्वारा संचालित

## भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Accredited with Grade 'B' (CGPA-2.54) by NAAC, Bangalore

# Our Inspiration



**Hon'ble**
**Late Shri Bhausaheb Mulak**
Ex. Minister, Maharashtra State
Ex. Mayor-NMC, Founder Chairman,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur



**Hon'ble**
**Smt. Sumanmala B. Mulak**
Chairperson,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur

### Founder's Message :

This is an age of modern science and technology and we are in the 21st century. India is growing economically and technologically and will join the list of 'Developed Nations by year 2020'. This growth is not possible without sound support of technical human resource. We at our college aim at overall development of the personality of an individual by providing best education, technical know how, personality traits and leadership qualities to grow as a manager & a technocrat.

# The Leader



**Hon'ble**
**Shri Rajendra B. Mulak**
Ex. Minister of State (Govt. of Maharashtra)
Finance & Planning, Energy, Water Resourses,
Parliamentary, Affairs & Excise
Hon. Secretary, BCYRC and BMCT



**Hon'ble**
**Smt. Prerna R. Mulak**
Managing Director,
B.C.Y.R.C. & B.M.C.T.,
Nagpur

### An introduction to BCYRC :

Backward Class Youth Relief Committee was founded in 1974 with the primary objective of upliftment of students belonging to Backward Class and Rural Areas. Founded by Late Shri Bhausaheb Mulak, Ex. Minister, Government of Maharashtra, Ex-Mayor of Nagpur Municipal Corporation and a man with vast experience and vision. This organization has grown by leaps and bounds. Shri Rajendra Mulak, Minister of State (Government of Maharashtra) and the Secretary of BCYRC, is an enterprising, dynamic and innovative personality. He is the catalytic force behind the progress of the organization and is a set example of leadership.



**Hon'ble Yashraj R. Mulak**
Treasurer, BCYRC & BMCT, Nagpur



**Shri D. K. Mahadik**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Mrs. Padmaja Shyam Dandge Patil**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Shri Padmakar Agrawal**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Dr. Jobi George**
Principal
Bhiwapur
Mahavidyalaya,
Bhiwapur

## महाविद्यालयाविषयी थोडेसे...........

आमच्या सर्व संस्थेचे संस्थापक, प्रवर्तक व आधारस्तंभ शिक्षणमहर्षी माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक आहेत. मा. भाऊसाहेबांनी ग्रामीण भागातील जनतेचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय जीवन जवळून तर बघितलेच पण त्या जीवनाचा त्यांनी स्वतः अनुभव घेतला. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण व नागरी जीवनाचे एक सुसंगत एकजिनसी आणि रसाळ मिश्रण होय. मा. भाऊसाहेबांनी मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण उत्थानाकरिता सन १९७४ मध्ये 'बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटी' ह्या संस्थेची नागपूर येथे स्थापना केली. महाराष्ट्राचे दिवंगत नेते व मुख्यमंत्री श्री. मा. सा. उर्फ दादासाहेब कन्नमवार हे गरीब घराण्यात जन्मलेले पण राजकारणात उत्तुंग शिखर गाठलेले वैदर्भीय नेते हे मा. भाऊसाहेबांचे प्रेरणास्थान व राजकीय गुरु होते.

माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी स्वतःला शैक्षणिक चळवळीसाठी वाहून घेतले आहे. व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन कर्मवीर दादासाहेब कन्नमवार अभियांत्रिकी महाविद्यालय, १९८३ साली नागपूर पॉलीटेक्निक व १९८९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालय ह्या संस्थांची नागपूर येथे स्थापना केली. ह्या नामवंत संस्थेत तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ विदर्भातीलच नव्हे तर पूर्ण देशातील विद्यार्थी घेत आहेत. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या नागपूर येथील ह्या संस्था माननीय श्री. भाऊसाहेब मुळक यांच्या तडफदार व्यक्तिमत्व आणि उत्कृष्ट कार्यशैलीमुळे थोड्याच काळात भरभराटीस आलेल्या आहेत. त्यांनी कोट्यावधी रुपये खर्च करुन हया संस्थांच्या भव्य वास्तू, प्रांगणे, मुलामुलींची वसतीगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे, व अद्यावत उपकरणांनी सज्ज प्रयोगशाळा उभारलेल्या आहेत. ही सर्व महाविद्यालये उच्च शिक्षाविभुषीत प्राध्यापकांनी युक्त आहेत. संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयात रुग्णांकरिता आंतरविभाग व बाह्य विभाग असून गरीब मागासवर्गीय जनता ह्या दवाखान्यात विनामूल्य लाभ घेत आहेत.

वरील महाविद्यालयीन संस्थांचे कार्य लक्षात घेऊन बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर ह्या शैक्षणिक संस्थेला महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता प्रोत्साहित केलेले आहे. आपल्या उमरेड ह्या जुन्या निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने व विशेषतः ह्या विभागातील मान्यवरांच्या विनंतीनुसार संस्थेचे संस्थापक – अध्यक्ष माननीय भाऊसाहेब मुळक यांनी भिवापूर ह्या ग्रामीण भागात सन १९९० साली भिवापूर महाविद्यालय भिवापूर स्थापन केले. भिवापूर क्षेत्रातील कमकुवत मागासवर्गीय व होतकरु विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती उपलब्ध असून विशेषतः पूर्ण वर्गाकरिता विद्यार्थ्यांना पुस्तके देण्याची व्यवस्था केलेली आहे. सन १९९५–९६ सत्रापासून महाविद्यालयाचे वर्ग संस्थेच्या नवीन इमारतीत भरत आहेत. महाविद्यालयाची शैक्षणिक सोईंनी उपयुक्त अशा भव्य वास्तूची निर्मिती प्रगती पथावर आहे. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात मुलामुलींची वसतीगृहे, कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने, अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे व भव्य ग्रंथालयांची बांधणी करण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

मा. स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी उमरेड निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे महाराष्ट्र विधानसभेवर प्रतिनिधीत्व करुन शासनात मंत्रीपद भुषविले हे सर्वांना माहीतच आहे. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटीच्या माध्यमातून ह्या ग्रामीण भागातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने खालील योजना आखलेल्या आहेत. भाऊसाहेबांनी योजलेल्या प्रकल्पांना पूर्णत्वास नेण्यास व संस्थेच्या विकासासाठी त्यांचे चिरंजीव मा. राजेंद्रजी मुळक उर्फ बाबासाहेब (माजी राज्यमंत्री) सातत्याने प्रयत्नरत असतात. त्यांच्या तडफदार व कार्यप्रवण शैलीमुळेच संस्थांची दिवसेंदिवस भरभराट होत आहे हे लक्षात घ्यावेच लागते. संस्थेचे माननीय सचिव माजी मंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब यांनी संस्थेच्या

शिक्षण वृक्षाला एक नवीन पालवी दिली. खेड्यातील तरुण हा स्वबळावर खंबीरपणे उभा असला पाहिजे यासाठी माननीय माजी राज्य मंत्री राजेंद्र मुळक साहेब यांनी अथक परिश्रमातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक बाबींकडे लक्ष पुरविले व वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनातूनच भिवापूर महाविद्यालयाचा 'निर्धार' पक्का झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले साहित्यिक व कलागुण स्पष्ट व्हावे व विद्यार्थ्यांमध्ये लेखनाच्या संदर्भात नवा जोश निर्माण व्हावा म्हणून 'निर्धार' ची संकल्पना पुढे आली. वाचकांना हा महाविद्यालयीन 'निर्धार' प्रचंड आवडेल अशी अपेक्षा आहे.

* राष्ट्रीय मुल्यांकन परिषद बंगलोर द्वारा महाविद्यालयाचे मुल्यांकन होऊन महाविद्यालयाला 'ब' श्रेणी प्राप्त झाली.
* ग्रामीण भागातील सुशिक्षित महिला, बालक मंदिरे व शिवणकला विद्यालये चालू करण्यास पुढे येत असल्यास त्यांना संस्थेद्वारे आर्थिक सहाय्य व अनुदान देण्याची योजना.
* ग्रामीण भागात महिला गृहद्योग व महिला मंडळांची स्थापना.
* राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत विविध कार्यक्रम राबविल्या जात आहेत. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेसाठी प्रोत्साहन गुण दिले जातात तसेच आंतर महाविद्यालयीन खेळ / क्रीडा स्पर्धात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन गुण दिले जातात.
* महाविद्यालय परिसरात भव्य सभागृह सामान्य जनतेच्या उपयोगासाठी बांधण्याची योजना लवकरच सुरु होत आहे.
* भिवापूर महाविद्यालयात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इ. विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) सुरु आहेत.
* भिवापूर महाविद्यालयात बी.लिब., एम. कॉम., एम.बी.ए., एम.एस.सी व विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाचे शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून संस्था प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.
* भिवापूर महाविद्यालयात बी.एस.सी. (विज्ञान शाखा) ची सोय विद्यार्थ्यांना नियमितपणे प्राप्त झाली आहे.
* आंतरराष्ट्रीय स्तराचा तरंग तलावाचे – काम पुर्णत्वाच्या वाटेवर.
* भव्य जिम्नॅस्टिक शाळेची सोय उपलब्ध आहे.
* इनडोअर स्टेडीयम व भव्य क्रीडांगण.
* मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सोय.
* महिला अध्ययन व सेवा केंद्राची स्थापना.
* एन.सी.सी पथकाची स्थापना.
* मुलींकरीता निःशुल्क ज्युडो कराटे प्रशिक्षण
* मुलींकरीता निःशुल्क फॅशन डिझाइनिंग अभ्यासक्रम.
* स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र.
* रोजगाराच्या संधीसाठी महाविद्यालयात परिसर मुलाखतीचे आयोजन.
* संगणक व इंटरनेट प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.
* संस्थेतर्फे के.डी.के. इंटरनॅशनल स्कूल ची सुरुवात.

**डॉ. जोबी जॉर्ज**
**प्राचार्य**
**भिवापूर महाविद्यालय, भिवापूर.**

# संपादकीय

भिवापूर महाविद्यालय भिवापूर या ग्रामीण भागातील **'निर्धार'** हा वार्षिकांक वाचकांच्या हातात देतांना अतिशय आनंद होत आहे. या आधीच्या वार्षिकांकची प्रशंसा झाल्यामुळे हा वार्षिकांक फुलेल, बहरेल व फळास येईल यात शंका नाही. भिवापूर सारख्या ग्रामीण भागात असणारे महाविद्यालय व महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्याच कल्पना, स्फूर्ती, प्रेरणा व प्रतिभेचे सहज सूंदर रुप या वार्षिकांकात सादर झाले आहे.

यशस्वीतेसाठी आमचे महाविद्यालयीन विश्वच प्रेरक ठरते. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमधील लेखन शैलीचा विकास होऊन समाजाप्रती असलेल्या ऋणानुबंधाची जाणीव या निमित्ताने करुन देण्याच्या दृष्टीकोणातून निर्धार या वार्षिकांकाची संधी आम्हाला मिळाली.

संस्थाचालक स्व. श्री. मा. भाऊसाहेब मुळक यांचे प्रोत्साहन, संस्थेचे सचिव माजी मंत्री ना. राजेंद्रबाबु मुळक व महाविद्यालयाचे कर्तबगार प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या प्रयत्नांनी वरिष्ठ विभागात झाली. (बी.एस.सी.) विज्ञान शाखेची सोय तालुका स्तरावर या महाविद्यालयात झाली आहे. त्यामुळे कनिष्ठ शाखेपासून पदव्युत्तर कला शाखा व पदवीपर्यंत वाणिज्य, विज्ञान शाखेची सोय विद्यार्थ्यांना मिळाली आहे. संस्थेचे सचिव, माजी मंत्री मा. राजेंद्रबाबु मुळक यांनी ग्रामीण भागाशी जवळीक साधून समाजाची सेवा करण्याचा मार्ग पत्करला आहे. संस्थेचे ऋण कधीच विसरता येत नाही.

महाविद्यालयाने या भागात अन्यत्र कोठेही नसलेला पदव्युत्तर अभ्यासक्रम (समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र) उपलब्ध करुन दिले आहेत. सोबतच ग्रामींण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शाखेची सुरुवात कनिष्ठ व वरिष्ठ विभागात झाल्यामुळे या परिसरांतील विद्यार्थ्यांना 'जो जे वांछिल तो ते लाहो' या सत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील उक्तीप्रमाणे वर्ग ११ वी ते पदवी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची संधी प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा हवा तो मार्ग पत्करावा या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा हे एक आव्हानच.

साहित्यिक व रसिकांच्या मधला दुवा साधून आम्ही 'निर्धार' रसिकार्पण करीत आहोत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची साहित्य सृजन निर्धारच्या माध्यमातून साकार होतांना अंकातील सर्वच लेखनाशी आम्ही सहमत आहोत असे नाही. तसेच या वार्षिकांकात समाविष्ठ झालेले साहित्य ही विद्यार्थ्यांची स्वतःची व संकलित केलेली लेखनकृती आहे असे गृहीत धरुन त्यांच्या साहित्याला स्थान दिले आहे. मागील अंकाप्रमाणे हा ही अंक सर्वांना आवडावा अशी अपेक्षा.

वार्षिकांकातर्फे सर्वांना शुभकामना!

| संपादक | मुखपृष्ठकार | मार्गदर्शक |
|---|---|---|
| कु. स्नेहल राठोड (मराठी) | कु. मोनाली कामडी | डॉ. मधुकर नंदनवार |
| कु. विना भोयर (इंग्रजी) | बी.एस.सी. द्वितीय | डॉ. राहील कुरैशी |

(या अंकातील सर्वच लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

## बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर

र.नं. महा. १५२/७४ नागपूर.

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. वामनराव गोविंदराव मुळक | – | उपाध्यक्ष |
| ३. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सचिव |
| ४. श्रीमती श्रीलेखा राजन लांजेकर | – | सहसचिव |
| ५. श्री. यशराज राजेंद्र मुळक | – | कोषाध्यक्ष |
| ६. श्री. दिलीप कृष्णराव महाडीक | – | सदस्य |
| ७. श्रीमती पद्मजाताई श्याम दांडगे पाटील | – | सदस्या |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. २३२३४९ (एस.टी.डी. ०७१०६)

## स्थानिक व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सदस्य |
| ३. श्री. डॉ. जोबी जॉर्ज (प्राचार्य) | – | सचिव |
| ४. श्री. पद्माकर कुंजीलालजी अग्रवाल | – | सदस्य |
| ५. श्री. डी. के. महाडीक | – | सदस्य |
| ६. श्रीमती पद्मजाताई श्याम दांडगे पाटील | – | सदस्या |
| ७. डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे | – | शिक्षक प्रतिनिधी |
| ८. श्री. विजय शंकरराव दिघोरे | – | शिक्षक प्रतिनिधी |
| ९. श्री. मोतीराज रामदासजी चव्हाण | – | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. श्री. सुभाष गणपतराव ढोक | – | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## महाविद्यालय प्रतिनिधी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्रभारी प्राध्यापक |
| ३. | प्रा. अनिता महावादिवार | विद्यार्थी परिषद प्रभारी |
| ४. | डॉ. विजय दिघोरे | रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी |
| ५. | प्रा. सोमेश्वर वासेकर | सांस्कृतिक विभाग प्रमुख |
| ६. | प्रा. आदित्य सारवे | क्रीडा विभाग प्रमुख |
| ७. | आशिष गायकवाड | विद्यार्थी क्रीडा प्रमुख |
| ८. | स्नेहल राठोड | सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी |
| ९. | गोपाल पाटील | रा.से.यो विद्यार्थी प्रतिनिधी |

## विद्यार्थी साहित्य मंडळ

कु. स्नेहल राठोड
कु. रचना नंदेश्वर
कु. मयुरी चौधरी
गोलूप्रसाद जेठामल
कु. संगिता मस्के
कु. कोमल ढोणे

## मार्गदर्शक

डॉ. मधुकर नंदनवार
डॉ. सुनिल शिंदे
डॉ. मोतीराज चव्हाण
डॉ. राहिल कुरैशी
डॉ. विजय दिघोरे
डॉ. अनिता महावादिवार

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) कला

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. जोबी जॉर्ज | प्राचार्य (इंग्रजी) |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्राध्यापक (अर्थशास्त्र) |
| ३. | डॉ. मंगेश व. कडू | प्राध्यापक (राज्यशास्त्र) |
| ४. | डॉ. मोतीराज रा. चव्हाण | प्राध्यापक (इतिहास) |
| ५. | डॉ. मधुकर वि. नंदनवार | प्राध्यापक (मराठी) |
| ६. | डॉ. विजय शं दिघोरे | प्राध्यापक (समाजशास्त्र) |
| ७. | डॉ. राहील कुरैशी | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ८. | प्रा. सोमेश्वर वासेकर | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ९. | प्रा. आदित्य सारवे | प्राध्यापक (शारीरिक शिक्षण) |
| १०. | प्रा. राजश्री ओ. पी. | प्राध्यापिका (ग्रंथपाल) |
| ११. | डॉ. विनिता विरगंधम | प्राध्यापिका (इंग्रजी) |

## वाणिज्य विभाग वरीष्ठ व कनिष्ठ

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. अनिता महावादीवार | प्राध्यापिका वाणिज्य |
| २. | डॉ. राजेश बहुरुपी | प्राध्यापक वाणिज्य |
| ३. | प्रा. कु. वर्षा मेश्राम | प्राध्यापिका (वाणिज्य) घडयाळी तासिका |
| ४ | प्रा. चेतन हेडावू | प्राध्यापक (वाणिज्य) घडयाळी तासिका |

## कनिष्ठ विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. किशोर घ. शेंडे | – | (राज्यशास्त्र, इतिहास) |
| २. | प्रा. उषा ना. चु–हे | – | (मराठी, समाजशास्त्र) |
| ३. | डॉ. वैशाली प्र. रहाटे | – | (इंग्रजी, अर्थशास्त्र) |
| ४. | प्रा. सागर यादव | – | विज्ञान |
| ५. | प्रा. स्वप्निल डाखोळे | – | विज्ञान |
| ६ | प्रा. ज्योती बान्ते | – | मराठी |
| ७ | प्रा. चेतना ठाकरे | – | वाणिज्य |

## वरिष्ठ विभाग - विज्ञान शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. नितीशा पाटणकर | – | प्राध्यापिका (प्राणीशास्त्र) |
| २. | डॉ. सारंग धोटे | – | प्राध्यापक (रसायनशास्त्र) |
| .3. | प्रा. अमित काळबांडे | – | प्राध्यापक (रसायनशास्त्र) |

## शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुभाष ग. ढोक | – | अधिक्षक |
| २. | श्री. सुधाकर ग. उईके | – | वरिष्ठ लिपीक |
| 3. | श्री. संजय मेश्राम | – | कनिष्ठ लिपीक |
| ४. | श्री. अमोल वि. भगत | – | कनिष्ठ लिपीक |
| ५. | श्री. शंकर को. फेंडर | – | शिपाई |
| ६. | श्री. रत्नाकर रा. कन्नाके | – | शिपाई |
| ७. | श्री. अ. जफार अ. गफ्फार | – | शिपाई |
| ८. | श्री. गुलाब र. गेडेकर | – | ग्रंथालय परिचर |
| ९. | श्रीमती सविता म. झोडापे | – | शिपाई |
| १०. | श्री. गणेश शहाणे | – | प्रयोगशाळा परिचर |
| ११. | कु. हर्षलता बोडे | – | प्रयोगशाळा सहाय्यक |
| १२. | कु. जीजा पराते | – | प्रयोगशाळा परिचर |
| १३. | श्री. खुशवंत दमके | – | प्रयोगशाळा परिचर |



१ ऑगस्ट लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रम प्रसंगी भाषण देतांना डॉ. सुनिल शिंदे




२ ऑक्टोबर गांधी जयंती निमित्त प्रतिमीचे पूजन करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज




१ डिसेंबर जागतिक एड्स दिना निमित्त एड्स रॅलीची सुरुवात करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज




राष्ट्रीय सेवा योजना 'युवावेध सप्ताह' उद्‌घाटन प्रसंगी प्रा. डॉ. जोबी जॉर्ज अध्यक्षीय भाषण करतांना



महाविद्यालय परिसरात वृक्षारोपन करतांना महाविद्यालयीन एन-सी-सी पथकातील विद्यार्थी




भारतीय लष्करांच्या सेवेसाठी महारक्तदान शिबीरात सहभाग व रक्तदान करणारे महाविद्यालयीन विद्यार्थी

# क्षणचित्रे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम प्रसंगी
भाषण देतांना डॉ. मधुकर नंदनवार



शिक्षक पालक सभेतील उपस्थित पालकांशी चर्चा करतांना
प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज




महिलाअध्ययन व सेवा केंद्राच्यावतीने 'स्त्रियांचे संरक्षण :
आजच्या काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन करतांना
रिटायर्ड फ्लाईंग ऑफीसर मा. शिवाली देशपांडे



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा मार्फत आयोजित कार्यशाळेत
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
नायब तहसिलदार मा. चैताली दराडे



'नवोन्मेष २०१७' के.डी.के. इंजिनिअरींग कॉलेज नागपूर
येथे नृत्य सादर करतांना महाविद्यालयाची चमू




Zoo Science Exhibition

# छायाचित्रे



…तील 'मिस्टर भिवापूर महाविद्यालय' पदक विजेता
करण मेश्राम सोबत प्राचार्य व प्राध्यापक वृंद




नृत्य सादर करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी



स्व. भाऊसाहेब मुळक स्पोर्टस् ॲकेडमी आणि
भिवापूर महाविद्यालय भिवापूर तर्फे
कबड्डी क्रीडा स्पर्धेचा रंगलेला सामना



Workshop on Grammar and Communicative English
for the Students of Bhiwapur.




इतिहास विभागातर्फे घेण्यात आलेल्या चर्चासत्रात
विचार व्यक्त करतांना विद्यार्थी व मागदर्शक डॉ. मोतीराज चव्हाण



महाविद्यालयातील एन-सी-सी पथकासह
प्रा. डॉ. जोबी जॉर्ज व प्राध्यापक वृंद

# क्षणचित्रे



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
नवनियुक्त पोलीस उपनिरीक्षक गोकुळसिंग राठोड



राष्ट्रीय सेवा योजना शिबीर प्रसंगी मार्गदर्शन करतांना
भिवापूर न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश मा. एस. एस. खलाने



राष्ट्रीय सेवा योजना शिबीर
दत्तक ग्राम अड्याळ येथे श्रमदान करतांना स्वयंसेवक



ग्रंथालय विभागाकडून आयोजित ग्रंथ प्रदर्शनी बघतांना
स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य मा. पद्माकर अग्रवाल,
प्राचार्य विनयजी बाबर, प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व इतर मान्यव



वार्षिकोत्सव प्रसंगी विज्ञान प्रदर्शनी बघतांना
प्राचार्य डॉ. विनयजी बाबर




महाविद्यालयाच्या वार्षिकोत्सव प्रसंगी
नाटकातील एक दृश्य

# 'निर्धार' वार्षिकांक
# मराठी विभाग २०१६ - १७

## संपादक



## कु. स्नेहल राठोड

## मार्गदर्शक
## प्रा. डॉ. मधुकर नंदनवार

## आई आणखी बाबा



आई आणखी बाबा यातुन
सांग मला रे सांग मला
आई आणखी बाबा यातुन,
कोण आवडे अधिक तुला ?
आई दिसते गोजिरवाणी,
आई गाते सुंदर गाणी
तऱ्हेतऱ्हेचे खाऊ येती
बनवायला सहज तिला
आई आवडे अधिक मला ।।
गोजिरवाणी दिसते आई,
परंतु भित्री भागुबाई
शक्तिवान किती असती बाबा
थापड देती गुरख्याला
आवडती रे वडील मला ।।
घरात करते खाऊ आई,
घरातल्याला गंमत नाही
चिंगम अन चॉकलेट तर
बाबा घेती रस्त्याला
आवडती रे वडील मला ।।
कुशीत घेता रात्री आई
थंडी, वारा लागत नाही
मऊ सायीचे हात आईचे
सुगंध तिचिया पाण्याला
आई आवडे अधिक मला ।।
निजता पण रे बाबा जवळी
भुते – राक्षसे पळती सगळी
मिशा चिमुकल्या करती गुदगुल्या
त्यांच्या अपुल्या गालाला
आवडती रे वडील मला ।।



**कु. अश्विनी गौतम लोखंडे**
बी.ए. द्वितीय

## आज कळून चुकलयं!

आज कळून चुकलय मला,
या जगात आपलं कोणीच नसतं ......
मनापासून जोडलेलं अनोळखी नातं,
आयुष्यात शेवटी परकच ठरत असतं ....
उपकार केल्यासारखी वागतात काही लोकं,
प्रत्येक नातं मतलबीपणाचं बळी ठरतं ....
स्वतःच्या जिवापेक्षा जास्तं जपलेलं नातं
एका गैरसमजामुळे धाग्यासारखं तोडलं जातं ..
कितीही आपलं समजा कुणी कुणाला,
शेवटी कुणीच कुणाचं नसतं .......
**शेवटी कुणीच कुणाचं नसतं .......**

**कु. सोनु वासुदेव शेळके**
बी. ए. द्वितीय

## वाट

भोवती काळोख आहे दाट पोरा
तुच शोधावी तुझी तु वाट पोरा
चालतानी जपत जा आपल्या जिवाला
जास्त आहे या पथावर घाट पोरा
गाठतांना ध्येय हे थांबु नको तु
लागले जंगल जरी घनदाट पोरा
भाकरी रांधायच्या आता स्वतःच्या
आयते मिळणार नाही ताट पोरा
खुप काही शिकविते ती माणसाला
या सुखापेक्षा व्यथेची लाट पोरा
रोजच्या या संकटाशी सामना कर
नेहमी काढू नको पायवाट पोरा
खाच खळगे, अडचणी असल्या तरीही
धाडसाने वलय आपुले थाट पोरा
एकटा झुंज दे वादळाशी
तु नको पाहु कुणाची वाट पोरा ।।

**तानाजी ठवरे**
बी. ए. तृतीय

## आयुष्य म्हणजे



आयुष्य म्हणजे वळणावळणाची वाट
कधी सरळ रस्ता तर कधी नागमोडी घाट
आयुष्य म्हणजे आपल्यांचा सहवास
कधी आनंदी तर कधी खिन्न जीवनप्रवास
आयुष्य म्हणजे पत्त्यांचा खेळ
विविध प्रसंगातला सुखदुःखाचा मेळ
आयुष्य म्हणजे पुढे पुढे चालत राहणे
निसटलेलं सुख भरल्या डोळ्यांनी पाहणे
आयुष्य म्हणजे वर्तमानातील अडचणी
भविष्याची चिंता अन् भूतकाळातील आठवणी
आयुष्य म्हणजे भावनांचा पसारा
अखेरच्या वळणावर थांबतो जीवनप्रवास सारा ।।

कु. मनिषा बोरकर
बी. ए. द्वितीय

## मैत्री



जीवनामध्ये मैत्री ही आनंद देऊन जाते
गोड असा स्पर्श आत्म्यास करते
ना सुंदरता, ना स्वार्थ, ना द्वेष
अशा या नात्यांमध्ये मैत्री
गुंफलेली असते.
मैत्री ही कधी प्रेमाचे स्वरुप
धारण करते कळत नाही कधी
प्रेमामध्ये स्वतःला न्याहाळतांना
जो आनंद होतो
गगनात न मावेनासा इतका
मैत्री तुटते तेव्हा दुःख
एखादी सुई टोचावी इतकच
पण जेव्हा पेम तुटते तेव्हा
सापाने दंश केला असा भास होतो
व्यक्तीच्या अनेक शब्दांनी नाते जमतात
पण फक्त एका शब्दानी नाते तुटते.



निधी साबळे
बी. ए. तृतीय

## आई

आई तुझ्या कुशीत, पुन्हा यावेसे वाटते
निर्दयी या जगापासून, दूर जावेसे वाटते ।।
कोणी न येथे कोणाचा, सारीच नाती खोटी
तुझ्याशीच फक्त आता, नाते जपावेसे वाटते ।।
कोळून प्यायलो मी, सुख दुःख सारे
माते तुझ्या विरहास, ना प्यावेसे वाटते ।।
कित्येक रात्री, ऐश्वर्यात लोळलो मी
अखेरच्या क्षणाला, तुझ्या कुशीत निजावेसे वाटते ।।
दगडातला तो देवही, आता नवसाविना पावेना
निःस्वार्थ ह्रद्य माऊली, तुलाच पुजावेसे वाटते ।।
असेन जर मजला, मानव जन्म कधी
आई तुझ्याच पोटी, पुन्हा जन्मावेसे वाटते ।।

मयुरी चौधरी
बी. ए. तृतीय

## बालपण



कुठे गेले ते बालपण ?
ते अंगणात दुडूदुडू धावणे
देवघरासाठी फुले गोळा करणे।
शाळेत न जाण्यासाठी नको ती नाटके
आणि गेल्यावर बाईंच्या छडीचा मार खाणे।
शाळेत मित्रांबरोबर खेळायला जाणे
लवकर आलो नाही म्हणून आईचे रागावणे।
बाबांच्या खांदयावरुन फेरफटका मारणे
रस्त्यावरील खेळण्यासाठी नुसता हट्ट धरणे।
रात्रीत रंग भरणाऱ्या त्या आजीच्या गोष्टी ऐकणे
गोष्टीतल्या शंका न राहून विचारणे।
सायकांळी ताईबरोबर अभ्यासाला बसणे
नाही केला म्हणून तिचे ते ओरडणे।
दमल्यावर आईच्या मांडीवरच झोपणे
नाही येत म्हणून तिचे ते बोबडे गुणगुणणे।
खरच कुठे गेले ना ते बालपण !

नितु वाघ
बी.एस.सी. द्वितीय

## यशाचे रहस्य

कल्पनाकडे आयुष्यातील मोठमोठ्या सिद्धी मिळविण्याच्या वेगवेगळ्या योजना होत्या. व्यवस्थापना विषयी एक पुस्तक लिहून प्रसिद्ध शिक्षक मुलांसाठी ती एक प्रकल्प सुरु करणार होती. आपण काही तरी मोठे कार्य सुरु करावे असेही तिला वाटत होते. मात्र वयाच्या सत्तावन्न वर्षापर्यंत तिचे एकही स्वप्न साकार होऊ शकले नव्हते. हल्ली तिच्याच निराशेची भावना डोकावू लागली होती, परिणामी चेहऱ्यावर म्हातारपणाच्या खुणा दिसू लागल्या होत्या. यशस्वी होण्यासाठी कोणत्याही प्रकल्पाची सुरुवात आजच करा. त्यासाठी वाट बघत राहिलात तर ती प्रतिक्षा अनेकदा न संपणारी असते. मग कल्पनासारखे म्हातारपण वेळेआधीच येते.

एका छोटया उद्योजकाने ठरवले की, एक अब्ज रुपये साठविण्याचे माझे ध्येय आहे. इतके पैसे साठविले की मी सुरक्षित असेन. आणि नंतर किरकोळ व्यापारात मग्न होईल. पण ते साठविण्यापुर्वीच हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्याचे स्वप्न अर्धवट राहिले. हे उदाहरण देत एक प्रसिद्ध विशेषज्ञ म्हणतात, 'थडग्यात यशस्वी होण्याचे हे एक उदाहरण आहे. बरेचसे लोक आयुष्यात काही मिळविण्यासाठी मनाच्या सामर्थ्याचा सदुपयोग करीत नाहीत. ते शारिरीक व्याधीचे कारण पुढे करतात. या कारणामुळे कोणतेही मोठे कार्य करण्यापासून ते वंचित राहतात. त्या छोटया उद्योजका प्रमाणे बऱ्याच रुग्णांच्या मनात असे विचार येतात की, जर मला काही त्रास नसेल तरच मी आयुष्यात काही तरी मोठे कार्य करु शकतो.

'मी करु शकतो हा दृष्टिकोन'
मी कधीच म्हणजे, कधीच हार मानणार नाही
मी करु शकतो हा विश्वास, ही वृत्ती.

**स्नेहल राठोड**
बी. ए. तृतीय

## सुवासिन स्त्री

भांगामध्ये कुंकू लावणे सुवासिनी स्त्रियांचे सूचक आहे. हिंदुमध्ये विवाहित स्त्रिया कुंकू लावतात. कुमारिका आणि विधवा स्त्रियांना कुंकु लावणे वर्जित आहे. कुंकू लावल्याने स्त्रियांच्या सौंदर्यामध्ये भर पडते. अर्थातच त्यांचे सौंदर्य वाढते. विवाहाच्या वेळी वर वधूच्या भांगात कुंकू भरतो. त्यानंतरच विवाह कार्य संपन्न होते. त्या दिवसापासून ती स्त्री आपल्या पतीचे आयुष्य दिर्घायु होण्यासाठी दर दिवशी नियमित कुंकू लावते. कपाळावर चमकणारे कुंकू हे सुवासिनी स्त्रियांच्या सौंदर्याचे प्रमुख अंग आहे.

स्त्रीचे सौभाग्य म्हणजेच कुंकू.

**प्रिती लग्ने**
बी. ए. तृतीय

## निसर्ग



धरती आपुली सुंदर सुंदर
हिरवळ आहे चोहिकडे
दिसते का कोठे वनराई ?
कॉंक्रिटची जंगले इकडे – तिकडे ।
संथ वाहणाऱ्या सुंदर नद्या
मोजा त्यातील प्लास्टिकच्या बॉटला
उंच उंच रम्य डोंगरावर
खागीच्या नक्षी कोणी रेखाटल्या ?
रस्त्यावरील उभे उंच उंच वृक्ष
पानांचा रंग तांबडा की हिरवा ?
कोठे गेला तो सांजवेळी
जाणवणारा थंड थंड गारवा ?

**गोलू जेठामल**
बी. ए. द्वितीय

## माणुसकी

माणसांच्या दुनियेत माणुसकी नाही
सैतानांच्या जगात संतांना किंमत नाही
टिमनी चेतविणारा वारा जगात वाहतो
प्रेम फुलविणारी झुळूक विहरत नाही
वा–याने भडकलेली आग विझते पाण्याने
पोटाची आग पाणी शमवू शकत नाही.
एकमेकांच्यां रस्त्यात दगडकाटे टाकती
मत्सरांना सावरणाने हात कोठे नाही
मायापाशी पाहणारे बरेच स्वार्थी जन
सहकार्याचा पाया घालणारे कोणी नाही
सहानुभूती सोडूनी माणसे गुर्मीत जाती
पशु पक्षी देती आपुलकीची ग्वाही
बुध्दिमान माणसाने गमविली माणुसकी
माणसापेक्षा प्राणी बरे
ज्यांना बुद्धी नाही.


**रोशनी वैरागडे**
बी.एस.सी. द्वितीय



## नभाचा गारवा

ऊन जरा जास्त आहे दर वर्षी वाटतं
भर उन्हात पाऊस घेऊन आभाळ मनात दाटतं
तरी पावलं चालत राहतात मन चालत नाही
घामाशिवाय शरीरामध्ये कुणीच बोलत नाही
तितक्यात कुठून एक ढग सुर्यासमोर येतो
उन्हा मधला काही भाग पंखानं खाली घेतो
वारा उन्हाळ मुलासारखा सैरा वैरा पळत राहतो
पाना फुला झाडांवरती छपरावरती चढून पाहतो
दुपार टळून संध्याकाळी सुरु होतो पुन्हा खेळ
उन्हा मागून चालत येतो गार–गार कातर वेळ
चक्क डोळयांसमोर ऋतु ओस बदलून घेतो
पावसा आधी ढगांमध्ये कुठून गारवा येतो .......

**तनुजा गजभिये**
बी. ए. तृतीय



## माझी नदी

नदी रुसली, आटून बसली
मान येऊन वाळूत घुसली
वाहत नाही, गात नाही
कुणाकडेही पाहत नाही
नदीचे काठ पाहती वाट
उतरुन येईल कुणी घाट
नदी माझी दिसत नाही
क्षेमकुशल पुसत नाही

कोंडली नदी तळयामंदी
माणूस स्वार्थी नव्हता आधी
तिचं वाहणं, जिवंत राहणं
तुम्हां – आम्हां जीवन देणं
माझी नदी गेली कुठे
तिच्याविना जीव तुटे
तिचं जीवन हिरावून घेतलं
तिच्यावर नव्हे, आपल्यावर बेतलं
माणसा सुधार चुक आधी
तुडुंब वाहता पाहशील नदी ।

**स्वाती तुरक**
बी.ए. तृतीय



## बंध मैत्रीचा

कुणी म्हटलं आहे "जीवघेणा छंद मैत्रीचा"
बाळगावा आज कुणी आनंद मैत्रीचा ?
सुखाचे सारे सोबती
दुःखात साथ देईल तोच मित्र
पण इतकं कळलं नाही
दुःखही देईल तोच मित्र
मानही कधी आवळेल हा छंद मैत्रीचा
माझे सारे तेच आहे
तुझे वेगळे जग झाले
होतो कधी जिवलग
भले आज रस्ते अलग झाले
आता मलाच नको, तुझा बंध मैत्रीचा ।।

**स्वप्निल केळझरकर**
बी. ए. द्वितीय

## जाणीव

कुणाला जाणीव ही नसते,
कुणासाठी कुणीतरी झुरते
कळीला त्रास होऊ नये म्हणून
एक फुलपाखरु बागेबाहेर फिरते
किती त्रास द्यावा एखाद्याला
यालाही काही प्रमाण असते
आपल्यावरुनच विचार करावा
समोरच्यालाही मन असते !

**लक्ष्मी वाघमारे**
बी. ए. तृतीय




## सुंदर विचार

### नशीब



नशीब कोणी दुसरं लिहित नसतं
ते आपल्याच हाती असतं
येतांना काही आणायचं नसतं
जातांना काही न्यायचं नसतं
मग हे आयुष्य तरी कोणासाठी
जगायचं असते खरे तर याच प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी
जन्माला यायचं असतं ........

### नाते

नाते तुझे माझे
हळूवार जपलेले
जसे रेशमाच्या दोऱ्यात
मोती ओवलेले ......

### मैत्री

निसर्गाला रंग हवा असतो
फुलांना गंध हवा असतो
माणूस हा एकटा कसा राहणार
कारण त्यालाही मैत्रीचा छंद हवा असतो .......

### स्वप्न


हृदयात येण्याचा रस्ता असतो
पण बाहेर जाण्याचा रस्ता नसतो
म्हणूनच लोक हृदयात येतात
पण ते जातांना तोडूनच जातात.

**कु. विना भोयर**
बी. ए. तृतीय

## मैत्री

धमनीत रक्त नसले तरी चालेल
पण आयुष्यात मैत्री ही हवीच
कितीही जुनी झाली तरी ती
नेहमी वाटते नवी.
रक्ताच्या नात्यात नसेल एवढी
मैत्रीच्या नात्यात असते ओढ
कशीही असली तरी शेवटी
मात्र मैत्रीच गोड.

लक्ष्मीं वाघमारे
बी. ए. तृतीय



## का तुला वाटते ?

का तुला वाटते मी तुझ्यापासून दूर जावे
हसता न येणारे हसू एकांतात हसावे
गर्दीत तूं असतांना अनोळखी पणाने वागावे
का तुला वाटतं मी क्षणात मरावे
सोबत माझ्या तुझ्या आठवणींना राख करावे
ना सुखासाठी ना दुःखासाठी मी रोज तडपावे
कधी तुझ्यासाठी तर कधी आपल्या प्रेमासाठी रडावे
सांग सखे कां मी असे करावे
कां तुला वाटते मी तुझ्यापासून दूर जावे
नात्यांना गळफास लावून आपल्या प्रेमाला
T. P. समजावे.

लक्ष्मी वाघमारे
बी. ए. तृतीय





## चिमण्यांची शाळा

चिमण्यांच्या शाळेत जाऊ का गं आई ?
नाही तेथे गुरुजी अन् नाही तेथे बाई
गणवेश त्यांना लागत नाही,
टायची सक्ती मुळीच नाही,
लिखाण नाही, गृहपाठ नाही,
पाठांतर तर अजिबात नाही.
गणित नाही, भूमिती नाही,
इंग्रजीची तर कटकट नाही,
भूगोल नाही, विज्ञान नाही,
इतिहासाचा तर तापच नाही.
सगळे तास खेळाचे असतील गं आई
साळूताई असतील खेळायला गं बाई.
चिमण्यांच्या शाळेत मी खूप खूप रमेन
झालेल्या गोष्टी तुला पण सांगेन.

ममता तलमले
बी. ए. तृतीय

## आई आणि बापाचे प्रेम

आई आणि बाप देवाजवळचा दिवा असतो. तो दिवा राबराब कष्ट करुन जळत असतो. त्याला आकार नसतो.

आई आणि बाप उन्ह – तहान सहन करुन काम करीत असते. आणि मुलांना जगवित असते. आई आणि बाप खूप खूप राबून मुलांना त्यातून प्रेम माया देत असते. त्यांना शिक्षण देत असते. आई ही चंद्राची कोर असते तर बाप हा वंशाचा दिवा असतो.

भारती काकडे
बी. कॉम. द्वितीय

## हसू नका

शुन्यातून शुन्य गेले उरले शुन्य
तुमच्या सारखे मित्र मिळाले हेच माझे पुण्य
आयुष्यात नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवा,
आंब्याच्या झाडाला आंबे येतात पण
वडाच्या झाडाला वडे येत नाही .......

एक गोष्ट लक्षात ठेवा,
झोपून अभ्यास केल्याने झोप येते
पण बसून अभ्यास केल्याने बस येत नाही.
हे जीवन आहे.
रस्ते साधे होते तेव्हा माणसेही साधी होती
आता रस्ते डांबरी झाली तर माणसेही डांबरट झाली.
"तुका म्हणे आपल्या पैश्यानी करावी पार्टी
नाही तर जग म्हणेल एडमिनच्या नांवाने
वाया गेली कार्टी"

मम्मी : चिंटू बाजारातून साबुदाणा घेऊन ये.
चिंटु : मम्मी गं ! उपवासाला साबुदाणा चालतो कां ?
मम्मी : हो
( चिंटु बाजारात जातो व साबुदाणा घेऊन येतो व रस्त्यावरच ठेवतो )
मम्मी : चिंटु साबुदाणा कोठे आहे ?
चिंटु : मम्मी तुच तर म्हटलं होतं की साबुदाणा उपवासाच्या दिवशी चालतो म्हणून मी रस्त्यावरच ठेवून दिला. " आता येईल की चालत चालत '

गुरुजी : मी तुम्हाला हिमालयावर दोन दिवसांपासून माहिती सांगत आहे आता सांगा हिमालय नसता तर काय झालं असतं ?
शुभम : सर, तुम्हाला दोन दिवस बोलावे लागले नसते.

बायको : कशी दिसतेय मी आज
नवरा : छान दिसत आहेस.
बायको : एक शेर म्हणा नं माझ्यासाठी
नवरा : ये जो लग रही हो इतनी प्यारी
इसपे पगार लग जाती है मेरी सारी ।।

**प्रणाली वाघमारे**
बी. ए. प्रथम

## फुलते

माह्या बापाच्या कष्टात
सारं वावर खुलते
सोयाबीन तुरीसंग
मस्तं पराटी फुलते. ............
तूर डोलते खुशीनं
सोयाबीन बी हासते
पराटीच्या पानामध्ये
भोला शंकर भासते ............
भोल्या शंकरावी लीला
बोंडाबोंडात दिसते
पानापानातून सारं
हिरवं वावर हासते ............
काया वावरात माह्या
सारा पांढराच सहा
हिव भरल्या दिसात
बोंड फुटे फुटे तहातहा ............
बोंडाबोंडातून जवा
सोनं पांढरं गयते
तवा मले माह्या 'बा चं
चीजं कस्टाचं कयते ............ ।।

**जगदिश मालोदे**
बी. ए. द्वितीय



## पाणीदार शिक्षण




अभ्यासक्रम समुद्राएवढे
शिकवतात तलावाएवढे ।।
समजते बादलीभर
लिहितो गडवाभर ।।
थेंबे थेंबे तळे साचे
सर्व शिक्षण दारात नाचे ।।
जो बोले सो निहाल
शिक्षणाचे झाले हाल ।।
जय–जय रघुवीर समर्थ
शिक्षणाचेच जीवन व्यर्थ ।।
आला 'चेक' तर केला देव
नाही तर हर – हर महादेव ।।
आता एकच उपाय करावा
पाणी अडवा पाणी जिरवा. ।।

**आरती शेंडे**
बी ए. द्वितीय

## मैत्री

शब्द अंतरीच असतात,
पण दोष जिभेला मिळतात.
मन स्वतःचे असते
पण दुसऱ्यासाठी लागते
ठेच पायाला लागते
पण वेदना मनाला होतात
दुःख हृदयाला होते
पण डोळ्यांना रडावे लागते
हेच खरे मैत्रीचे नाते असते
पण ते इतरांना कळत नसते.



**शुभम धनविजय**
बी. ए. तृतीय

## मैत्री

फुल सुकते, गवत वाळते
पण मैत्रीच्या पवित्र नगरीत झालेली ओळख
कायम राहाते.
कधी हसायचं असतं तर कधी रुसायचं असतं
मैत्रीरुप वृक्षाला आयुष्यभर जपायचं असतं.

**शिंपल्यात** पाणी घालून
समुद्र कधी दाखवता येत नाही,
हाताने काढलेल्या फुलाला
सुगंध कधी येत नाही.
निळ्याभोर गगनाचा अंत कधी होत नाही
आणि नाजूक अशा मैत्रीचा उल्लेख शब्दात मात्र होत नाही .

**प्रेम** माणसावर करा त्याच्या सवयीवर नाही ......
नाराज व्हा त्याच्या बोलण्यावर पण त्याच्यावर नाही
विसरा त्याच्या चुका पण त्याला नाही
कारण माणुसकी पेक्षा मोठं काहीच नाही ........

## आयुष्य

छोट्या या आयुष्यात
खूप काही हवं असतं
पण पाहिजे तेच मिळत नसतं
असंख्य चांदण्यांनी भरुन सुद्धा
आपलं आभाळ मात्र
रिकामं असतं
हव्या असलेल्या सगळ्याच गोष्टी
माणसाला मिळत नसतात
पण न मिळणाऱ्या गोष्टीच
माणसाला का हव्या असतात !


**कु. मयुरी नंदरधने**
बी. ए. तृतीय

## त्या दारु पाई



पाऊले चालती दारुची वाट
सुखी संसाराशी फिरवूनी पाठ ।।धृ।।
घुट – घुट पेई
त्याला काळोखाची साथ
नशेमध्ये भान विसरला
रुसली पहाट .......
हातामंदी बॉटल
घेऊन पडला गडरात
मातीमोल झाले सारे
कपडे अन् कोट .........
घशामध्ये गेली की
मग बोलतो हा खोटं
पोटामध्ये गेली की
मग किडनीवर चोट .........
अंत कसा आला
तुटली जन्माची गाठं
सखे सोयरे रे
आले पडलिया खाट .........
म्हणे दारुपाई
घराची लावलीय वाट
दोन चकरा मारुनी
फोडतिया माठ .........

प्रिती गायधने
बी. ए. तृतीय



## सुविचार

आयुष्यात येणारा प्रत्येक क्षण हा सुखाचा–आनंदाचा आहे, हा विश्वास मनात बाळगून त्या क्षणाला सामोरे जा. तो क्षण जरी तुमच्या कल्पनेप्रमाणे सुखाचा नसला, तरी त्या क्षणाची चांगली बाजू ओळखा आणि मग जादू बघा तोच क्षण तुम्हांला सुखाचा वाटायला लागेल.



सत्याच्या वाटेवर स्वप्न तुटून जातात,
निसर्ग बदलला की फुले सुकून जातात,
मनापासून आठवण काढली आहे तुमची
पुन्हा म्हणू नका आपली माणसे विसरुन जातात ........

ज्या दिवशी तुम्ही तुमचं आयुष्य मनमोकळेपणाने जगलात, तोच दिवस तुमचा आहे. बाकी तर फक्त कॅलेंडरच्या तारखा आहेत.

## आधुनिक जगाच्या आधुनिक म्हणी

* प्रयत्ने लाइनीत उभे राहता रॉकेलही मिळे।
* अन्यायाचा फास बरा ; पण चौकशीचा त्रास आवरा.
* जया अंगी खोटेपण तया मिळे मोठेपण.
* वेळीच न्हाई शिकलो अन् भिकेला लागलो.
* सरकार जेवू घालीना, पदवी भीक मागू देईना
* वशिल्याच्या नोकरीला इंटरव्ह्यु कशाला ?
* वयही गेले, पैसेही गेले, हाती राहिले दाखिले.
* घोड्याच्या शर्यतीत वशिल्याचे गाढव पुढे.
* साहेबापुढे वाचली गीता, कालचा मेमो बरा होता.
* गाढवापुढे वाचली गीता, वाचणारा गाढव होता.

## आवड

आवड ही एक ओढ असते.
कोणी कधी, कशी भुरळ पाडते.
आल्यास ,काही तरी खूण देऊन जाते.
नजरेत आपणास सतत दिसते.
भेटण्यास काळीज लूपलूप करते
बोलण्यास मन सतत होते.
त्या क्षणाची वाट पहात राहाते.
मनातलं सांगण्यात आनंद वाटते
हलकाई जिवाले त्यावेळी जाणवते.
सुखात मित्राच्या आनंद वाटते.
दुःखात त्याच्या अश्रू येते.
स्वार्थाची भावना मनात येते.
आनंदाची त्याच्या चिंता होते.
जिव्हाळा त्याच्या जीवास येते
लावण्यमय कृती करते.
हसल्यास तो सुंदर दिसते
खूपच जास्त आवडून जाते.
दुसऱ्या कोणाचा ना विचार येते
स्वभावात त्याच्या मोहून जाते.
कधीही मदत कुणाची करते
विचारात त्याच्या शहाणपण वाटते.
गोष्ट आपल्या ह्रद्यात ठेवते
दुःख झाल्यास ना कधीच बोलते
विश्वास कुणाचा ना कधीच मोडते
आनंदी ठेवण्यास तत्पर राहाते.
दुसऱ्याच्या मनात छाप पाडते
म्हणून सर्वांस प्रिय होते.

**कु. निधी साबळे**
बी. ए. तृतीय

**NOTICE**
**Our safety depends on cleanliness**



## स्वच्छता

स्वच्छता नेहमी नाराज होती
सगळेजण तिला बेकारीत सोडती
न मिळे सुटका त्यापासूनी
आरोळ्याच आरोळ्या सतत फोडती.
न ऐकल्याचे सगळे नाटक करती
अशुद्ध करण्यास तयार होती.
सगळेत त्यात हातभार देती
न विचार कोणाचा कधीच करती.
म्हणता येई आपणा
सगळीच दुनिया त्यातच मोडती.
बेकारी त्यांच्या विकटूनी जव
स्वच्छतेला मिळणे कठीण आहे स्वातंत्र्य
स्वच्छता स्वच्छता ओरडूनी जव
शेवटी मरणे तिच्या नशिबात
कोणापुढे हात पसरवावे
असा तिचा असे नेहमीचा प्रश्न.

**कु. निधी साबळे**
बी. ए. तृतीय

## आनंद

आयुष्यातली सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आनंद. गमतीची गोष्ट अशी की, मौल्यवान असूनही परमेश्वराने आपल्याला ती विनामुल्य दिलेली आहे. पण त्याहुनही गमतीची गोष्ट अशी की, आपल्या पैकी बऱ्याच लोकांना आयुष्य संपेपर्यंत त्याचा पत्ताच नसतो.
उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाला आनंदाने सामोरे जा. मावळतांना तो तुम्हाला खूप समाधान देऊन जाईल.

**कु. स्नेहल राठोड**
बी. ए. तृतीय

## संधी



ज्याला संधी मिळते
तो नशिबवान।
जो संधी निर्माण करतो
तो बुध्दीवान।
पण जो संधीचे सोने करतो
तोच विजेता ।
आनंद शोधू नका
निर्माण करा
छोट्या छोट्या गोष्टींमधून.

## शब्द

जीव लावणारे शब्द आयुष्य घडवतात.
तर जिव्हारी लागणारे शब्द आयुष्य
बिघडवतात.
शब्द प्रेम देतात, शब्द प्रेरणा देतात,
शब्द नातं देतात
शब्द आयुष्यभर आणि आयुष्यानंतरही
मनामनात जपणारी भावना देतात.
शब्दांच मोल जपलं की आपलं
आयुष्यही अनमोल होतं. ।।



## आनंद

सर्वांच्या नशीबात सुखाचा उपभोग लिहिलेला असतो
कुणाला ओंजळभर मिळते , तर कुणाला रांजणभर
पण त्यातून मिळणारा आनंद ज्याला कळला
तोच खरे जगणे शिकला.

**स्नेहल राठोड**
बी. ए. तृतीय

## पराभव

पराभव पहिल्यांदा रणांगणात होत नाही, तर पराभव पहिल्यांदा मनात होतो. जी माणसे मनाने पराभूत असतात ती रणांगणात जिंकूच शकत नाही. आणि जी माणसे मनाने जिंकलेलीच असतात, ती रणात पराभूत होऊच ,शकत नाही. पहिल्यांदा मन जिंकणे जास्त गरजेचे रण मग आपोआप जिंकले जाते. लोखंडाला कोणी नष्ट करु शकत नाही पण त्याचा स्वतःचा गंजच त्याला नष्ट करु शकतो. जीवनातले चढ–उतार हे माणसांच्या जगण्यासाठी आवश्यक आहे कारण ईसीजीच्या सरळ रेषेचा अर्थही मृत्यु दर्शवितो.


**सुविचार**

आनंद हा एक भास आहे
ज्याच्या शोधात आज प्रत्येक जण आहे
दु:ख हा एक अनुभव आहे
जो प्रत्येकाकडे आहे
तरीही अशा जीवनात तोच जिंकतो
ज्याचा स्वतःवर पूर्ण विश्वास आहे.

## जिंकायचे नाही तर जगायचे आहे

समुद्रातील तुफानापेक्षा मनातील वादळ अधिक भयानक असतात. म्हणून मनातल्या गोष्टी जवळच्या व्यक्तींना नक्की सांगा कारण ........................
त्याचे मन हलके तर होईलच आणि चढण्याची ताकद पण येईल. मी दुनियेबरोबर लढू शकतो पण आपल्या माणसा बरोबर नाही. कारण ......................
आपल्या माणसाबरोबर मला जिंकायचे नाही तर जगायचे आहे.

**मेघा बडनाग**
बी. ए. द्वितीय



## दारिद्र्य



जन्म व्हावया, दारिद्र्य कुटुंबी
नसे स्पर्श, त्या छकुल्यालाही
कोणास दोष न देता येई
नशिबी आपल्या हेच हाई
सुख न बघाया घडीला
आनंद मानिया, मातीतही आयुष्य आपले
या अंधारी उजेडाची ती वाट पाही.
संकटी असे न मिळे सहारा
रक्ताची माणसं दुरुन दाखवी बहारा
काय नशीब घेऊन आलिया जन्मी
व्हावे दुःख सतत माझ्या मनी
जगी न असे कोणाचा कोणी
पाहून हे जगी मन दुःखी होई
वडिलांचे जीवन चरित्र ऐकावया जेव्हा
डोळी येई अश्रू सांगू कुणा तेव्हा
हाकलून लावी घरातलीया लोका
होई ते ऐकून काळजाच्या वेदना
न विचारी कोणी आपल्या लोका
मतलबापोटी सगळे दाखवी पुकारा
मायेचा स्पर्श न मिळाया कुठे
जगणे आहे कठीण हे आयुष्य मोठे.

**निधी साबळे**






## सुविचार

* शाळा हे समाजाने, समाजाच्या विकासासाठी निर्माण केलेले एक संस्कार केंद्र आहे.
* चारित्र्याचा विकास घडविते तेच खरे शिक्षण. नम्रता हा माणसाचा खरा दागिना आहे.
* बालमनाची कळी प्रेमाच्या फुंकराने फुलवित असतात तेच गुरु.
* प्रयत्न हा परीस असून त्यामुळे वाळवंटाचे नंदनवन करता येते.
* विजय हा गुण सर्व सद्गुणांचा अलंकार आहे.

## गुरु

गुरु म्हणजे विद्येचा सागर
सद्गुणांचा आरसा
जिव्हाळ्याचा स्पर्श
जगाचा उजेड
विश्वाचा 'कर्तालेखा
श्रेष्ठ नांही या जगात कोणी
असे हे गुरु महान म्हणूनी
नसे या जगात याहूनही प्रिय
असा भास होई सर्वांस
लोकांनी बोधिया सर्वश्रेष्ठ स्थान
नये या कोणी पृथ्वीवरी या
संकट आलिया जेव्हा कोणा
गुरु नाम तोंडून उदगारलिया तेव्हा.
प्रथम स्मरण गुरुचेच होई
नसे या जगी याहूनही प्रियी
गुरुची मूर्ती आपल्या ह्रदयी बसवूनी
होई आठवण स्मरण व्हावया
विश्वास ठेवूनिया गुरुवर जो
विजय मिळविण्यास नये कठीण
देवाचे स्मरण गुरु बघुनिया
आहे हे स्थान महान म्हणुनिया.

**निधी साबळे**

## ज्ञानाचा दिवा

ऐका मुलांनो ऐका आत घडवावा इतिहास नवा
ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा.
हाती घ्यावी खुशाल क्रांतीची पेटती मशाल
जर का अज्ञानी राहाल, अधोगतीला निमंत्रण द्याल.
शिकून संघर्ष करावा, सांगतसे रामजीचा भिवा
ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा.

## आस



नखातून कापूस उपसता उपसता
ती स्वतःच झाली पऱ्हाटी
कापसाला सोनं म्हणतात म्हणे,
तिच्या लुगड्याला मात्र सतरा गाठी.
कडबा सोंगता सोंगता
त्याच्या हाताची धार बोथट झाली
रात्री देशीत तर्र ............ होऊन त्यानं
उपाशी जीवाची पाठ सोलली।
फुटक्या कंदीलाच्या मंद उजेडात
तुऱ्हाटीत वाळलेले हात पुस्तकात राबतात
तिच्या थिजल्या डोळ्यांनाही मग
सायबाची माय झाल्याची स्वप्नं पडतात,
ती असते आई .................... ती असते माई ।।

**सपना ढोमणे**
बी. कॉम. प्रथम

## ध्येय कधी सोडू नको !

काम असेल कठीण, नसतं कधी अशक्य
पूर्णविराम नंतर तर, संपतं रे पूर्ण वाक्यं
नशीबाला शिव्या देव प्रयत्नांना मुकरु नको.
काटेरी मार्ग असेल पण ध्येय कधी सोडू नको.
जन्माला आला आहे तर जग, नको पाहू मागे
आयुष्याच्या शेवटी बाकी फक्त
आठवणींचे धागे
माणूस म्हणून जगला पण
सामान्य माणूस म्हणून मरु नकोस
काटेरी मार्ग असेल पण ध्येय कधी सोडू नको.

**रचना नंदेश्वर**
बी. ए. प्रथम

## भ्रष्टाचार




भ्रष्टाचार म्हणजे काय ?

एखाद्या वेळेस कोणत्याही शाखेचा सरकारी कर्मचारी सरकारी पैशाचा किंवा खजिन्याचा स्वतःच लूटमार करतो किंवा गैरवापर करतो त्याला भ्रष्टाचार असे म्हणतात. आपल्या देशात अलिकडे भ्रष्टाचाराला फार जोर आला आहे. अनेक कर्मचारी मोठ–मोठया पदावर असतात तरी सुद्धा पैशाच्या मोहापायी सरकारी पैशाचा गैरवापर करतात, सरकारी खजिना लुटतात. अशा प्रकारच्या समस्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढतच चालल्या आहेत याला जबाबदार कोण ? लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय की मंत्री नेते ?

अशा व्यक्तीला किंवा नेत्याला कडक शिक्षा व्हायला पाहिजे किंवा सरकारने म्हणजे कोर्टाने फाशी जर दिली तर भ्रष्टाचार थांबू शकतो. असे व्यक्ती पुन्हा चुका करणार नाही. एकेकाळी हर्षद मेहता ने शेयर्स घोटाळा करुन सरकारच्या हातावर तुरी पेरल्या , त्याचे सरकारनं काहीच बिघडवलं नाही. असच जर चालत राहिलं तर देशाचा मान किनाऱ्यावर येऊन पोहचेल. प्रत्येक भारतीय व्यक्ती किंवा सरकारी व्यक्ती त्याने देशाकरीता प्रामाणिकपणे काम केलं पाहिजे. त्याला त्याच्या मेहनतीचा मोबदला आपली भारत सरकार देतेच, मग त्याने या देशाशी बेईमानी, दगाबाजी कां करावी ? आपण भविष्यात पुढारी नेता जर झालो तर गरीबाच्या कल्याणांकरीता घरे, शेती त्यांना उपलब्ध करा. सरकारी पैशाचा उपयोग देशाच्या कल्याणासाठी आणि विकासाकरीता करा. भ्रष्टाचाराला आळा घाला. भ्रष्ट नेत्यांना सार्वजनिक ठिकाणी चप्पल जोड्यांनी मारा. जे काम सरकारी पोलिस करत नाहीत ते तुम्ही करा कारण खरे लोकतंत्र तुमच्या हातात आहे. तर लहान तोंड मोठा घास अशी म्हण आहे. पण जे काही सांगितलं आहे ते अगदी खरं आहे.

जय हिंद – जय भारत

सत्य सांगण्यासाठी कुणाच्याही शपथेची गरज नसते.
नदीला वाहण्यासाठी कुठल्याही रस्त्याची गरज नसते.
जे आपल्या हिमतीच्या जोरावर जीवन जगतात
त्यांना ध्येयाकडे पोहोचण्यासाठी कुठल्याही रथाची गरज नसते.

## आईचा गर्भ



किती मंद तो प्रकाश तुझ्या गर्भामध्ये होता
गर्भाला तो काळ माझ्या भोवताली होता.
एकटाच मी अनं माझं जग तुच होतीस
तुझ्या ह्दयाचा आवाज किती मधुर तो होता.
तुझ्या प्रत्येक स्पंदनावर माझा छोटा जीव होता
तुला मला जोडणारी एक कोमल दोर आत होती
तुझी नाळ ती जणू वेल मला लपेटलेली होती.
तुझा आवाज येता ओठ माझे हसायचे
कान माझे फक्त तुझ्या आवाजाला तरसायचे.
तु स्वतःला किती जपलेस.
एक मी जगावं म्हणून ती किती मरायचीस.
जन्म मला देतांना किती सोसले तू त्रास
पण मी जगावं फक्त हाच तुझा ध्यास
गर्भातले ते महिने पुन्हा येणार नाहीत
पण मी अजुनही तुझ्या शिवाय जगू शकणार नाही.

## सकाळ



संपु दे अंधार सारा
उजळू दे आकाश तारे
गंधाळल्या पहाटेस येथे
वाहू दे आनंद वारे ........
जाग याची सृष्टीला की
होऊ दे माणूस जागा
भ्रष्ट सारे नष्ट व्हावे
घट्ट व्हावा प्रेम धागा
स्वच्छ सारे मार्ग व्हावे
अन् मने ही साफ व्हावी
मोकळ्या श्वासात येथे
जीवसृष्टी जन्म घ्यावी.
स्पंदनांचा अर्थ येथे
एकमेकांना कळावा
ही सकाळ रोज यावी
माणसाचा देव व्हावा.



**पुजा सेलोरे**
बी. ए. तृतीय

## लेक माझी

अशी कशी लेक देवा माझ्या पोटी येते
नाव सुदधा माझं ती इथेच ठेवून जाते ।।
पहिला घास देवा ती माझ्या कडून खाते
माझाच हात धरुन ती पहिलं पाऊल टाकते.
माझ्याचकडून पहिलं अक्षरही शिकते.
तिच्यासाठी सुदधा मी रात्र रात्र जागतो
कुशीत तिला घेण्यासाठी वाट मी बघतो
मी आणलेला फ्रॉक घालून घर भर नाचते
एक दिवस अचानक ती मोठी होऊन जाते.
बाबा तुम्ही दमलात का हळूच मला विचारते
कळत नाही मला देवा असे कसे होते
कधी जागा बदलून ती माझीच आई होते
देव म्हणाला ऐक पोरा तुझे तिचे नाते विश्वासाचे.
एक मुलगी असावी, साजरी गोजरी दिसावी
नाना मागण्या पुरवतांना तारांबळ माझी उडावी
एक तरी मुलगी असावी, जवळ येऊन बसावे
मनातले गुपीत तिने हळूच कानांत सांगावे.
एक तरी मुलगी असावी गालातल्या गालात हसावी
कधीतरी भावनेच्या भरात गळ्यात मिठी मारावी.
एक तरी मुलगी असावी ।


## आई

घर सुटतं पण आठवण कधी सुटत नाही.
जीवनात आई नावाचं पान कधीच मिटत नाही.
सारा जन्म चालून पाय जेव्हा थकून जातात
शेवटच्या श्वासाबरोबर 'आई' हेच शब्द उरतात.

"स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी"
"आ म्हणजे आत्मा, ई म्हणजे ईश्वर"
आत्मा व परमात्मा यांचे एकरुप म्हणजेच आई .

**अश्विनी वाघमारे**
बी. ए. तृतीय

## सुंदर विचार



गाईच्या कासेमध्ये राहूनही गोचीड जसे गाईचे दूध न पिता रक्तच पित असते, तसेच ज्ञानी लोकांच्या सान्निध्यात राहूनही मूर्ख लोकं ज्ञान ग्रहण न करता त्यांच्यात वाईटच शोधत बसतात.

"महत्त्वाकांक्षा" असल्याशिवाय माणूस मेहनत करीत नाही आणि मेहनत केल्याशिवाय महत्त्वाकांक्षा पूर्ण होत नाही. आयुष्यात स्वतःला कधी उध्वस्त होऊ देवू नका कारण लोक ढासाळलेल्या घराच्या विटा सुद्धा सोडत नाहीत.

तु माझ्या हृदयातच आहेस हे सत्य मी जाणतो पण माझ्यातला अडाणीपणा मला देवळात नेतो.

लोकांचं कसं असतं जोपर्यंत ठीक आहे तोपर्यंत देवाला दुरुनच हात जोडतात आणि थोडसं कमी पडायला लागलं की देवळात जाऊन नारळ फोडतात.

मित्र :

आयुष्याच्या वेलीवर मैत्री हे कधी न गळणारे फूल आहे. फुलवावी तितकी ती फुलते. पाकळ्या गळू न देणे हे मित्राचे काम आहे. त्या फुलाचा गंध म्हणजे विश्वास आहे. त्या विश्वासाची किंमत ठेवणं हाच मैत्रीचा सन्मान आहे.

न संपणारे अखंड स्मित असावे, न बोलता ऐकू येतील असे शब्द असावे, उन्हाळ्यात ही पाऊस पडेल असे ढग असावे, दुःखातही साथ देतील असे मित्र असावे.

प्रेम :

एक दिवशी माझा श्वास बंद होईल. नको विचार करुस की माझं प्रेम कमी होईल. अंतर फक्त एवढच असेल आज मी तुझी आठवण काढत आहे उद्या माझी आठवण तुला येईल.

आई :

जेव्हा एखाद्याच्या घरी भाकरीचे चार तुकडे आहेत आणि खाणारी पाच तोंडे आहेत तर त्या घरातील एकच व्यक्ती मला भूक नाही असं म्हणते .................. आई.

आभाळाची साथ आहे
अंधाराची रात आहे
कुणालाही घाबरत नाही
कारण पाठीवर बाबासाहेबांचा हात आहे.

जिच्यावर प्रेम करावे असे कुणीच भेटले नाही. पण जिच्यावर मनापासून प्रेम केले तिला माझे प्रेम कधीच समजले नाही.

**गोपाल पाटील**
**बी. ए. तृतीय**

## "वाटणी"

जातीसाठी माती लोक खातात यारा
मानव धर्माला मूठमाती देतात यारा
कुपोषित झालयं, माझं रोपटं मानवतेचं
बहरलं जातियतेचं पीक, त्यांच्या शेतात यारा.
धर्माच्या नावे निघती नाना उपदेश, फतवे
गीता – कुराण गुंडाळून ते ठेवतात यारा
एकमात्र राहिले त्यांचे शाबूत बंगले
अश्रूने झोपड्या येथे पेटतात यारा
भगव्या – हिरव्यांची झाली वाटणी मनमानी
तिरंगाही पडला आज विचारात यारा
मानवतेच्या पुजारीला जरी तुम्ही संपविले
राहिले गीत माझे, फुलाफुलांत यारा ....... ।



**कु. स्वाती रामटेके**
**बी. ए. द्वितीय**

## "माऊली"

आई या विषयावर पानेच्या पाने खर्ची पडली आहेत. त्या मॅगझिन गोष्टींची 'मदर' असो की 'श्यामची आई' असो. आईचं महत्वं आणि महात्म्य लिखाणातून विशद केलं म्हणजेच कळतं असं नाही ; परंतु आईप्रति दोन कृतज्ञतेचे शब्द रुक्ष कागदावर उतरविले. आणि डोळ्यातल्या अश्रूंचा त्याला ओलावा लाभला की, तिच्या अथांग सागरएवढा प्रेमऋणाचा एक बिंदू फेडल्याचं समाधान वाटतं.

"स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी"

आई या शब्दाची व्याप्ती, आईविना भिकारी ....... विस्तृत आहे. आईच्या ऋणाची परतफेड करणे तर दुरच ; पण त्याची बरोबरीही आपण करु शकत नाही. आई हे परमेश्वराचच रुप आहे. असं म्हणतात की ..... परमेश्वराला तर प्रत्येक ठिकाणी राहाणं शक्यं नव्हतं, म्हणून त्यांनी प्रत्येक ठिकाणी आईला पाठविलं आहे. माय, माता, माँ अशी असंख्य नांवे आहेत. पण एका नावात संपूर्ण विश्वं सामावलं, ती म्हणजे आई ........ आईविषयी आजवर अनेकांनी आपली मने जाहीर केली. गीतेपासून तर कुराण, बायबलपर्यत आईची महती थोर आहे.

"आई एक नाव असतं, घरातल्या घरात गजबजलेलं नाव असतें. ........

आई म्हणजे जन्माची शिदोरी आहे. ती सरतही नाही आणि उरतही नाही. आई सर्वांना आपल्यात सामावून घेते. तिचं मातृत्व, वात्सल्य घरभर विखुरलेलं असतं. ती स्वतः दु:खात राहाते. पण आपल्या मुलांना सुख देते. प्रकाशाची जननी कधी कधी आपल्या मुलाच्या सुखासाठी सर्वस्व पणाला लावते. तरीसुदधा अशा असंख्य माता आहेत. आई म्हणजे फुल आंहे. या फुलाला जपणं आपलं कर्तव्य आहे. पण अशी अनेक मुले आहेत ज्यांना आई ओझं वाटायला लागते. तुम्हाला मोठं करणं तिचं कर्तव्य होतं ते तर तिने कर्तव्य समजून नाही तर तुम्ही तिच्या काळजाचा तुकडा आहे म्हणून निभावलं. आता तिला तुमच्या आधाराची गरज आहे. तिच्याप्रती असलेलं तुमचं कर्तव्यं निभावण्याची वेळ आली आहे. तर तुम्ही कर्तव्याकडे पाठ का फिरवित आहात ?

आईचं मुल होण्याचं कर्तव्य निभवा. बरेच जण असे दुर्दैवी असतात, ज्यांना आईच नसते. पण ज्यांना आई असते त्यांनाही मातृसुख मिळत नाही. त्यांच्यासारखे दुर्दैवी कोण असणार ?

"आई माझी मायेचा सागर, दिला तिने जीवना आकार.

**स्वाती रामटेके**
बी. ए. द्वितीय



## घडली की बिघडली

हुशारी मिळवितांना शहाणपण विसरली.
तंत्रज्ञानामागे धावतांना आत्मज्ञान विसरली.
पैसा ही शक्ती समजून ईश्वरभक्ती विसरली.
समजत नाही मी घडली की बिघडली ।।
परफ्युमच्या वापरामुळे सुगंध विसरली
चातुर्य मिळवितांना चरित्र विसरली
जगाच्या भुगोलात गावाचा इतिहास विसरली
समजत नाही मी घडली की बिघडली ।।
धन जमा करतांना समाधान विसरली
तंत्रज्ञान शोधतांना ते वापरण्याचे विसरली
परिक्षार्थी शिक्षणात हातचे कौशल्य विसरली
समजत नाही मी घडली की बिघडली ।।
सतत धावतांना क्षणभर थांबणं विसरली
जागेपणी धावतांना सुखानं झोपणं विसरली
समजत नाही मी घडली की बिघडली ।।

**आरती श्रीरामे**
बी. कॉम. प्रथम



## स्त्री भ्रूणहत्या




विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मात्र स्त्री ची भीषण परिस्थिती होती. स्त्रियांना शिक्षणापासून पूर्णतः वंचित केले गेले होते. केशवपणाची अघोरी पद्धत धर्माचरण मानली जात होती. तथाकथित धर्ममार्तंडामुळे स्त्री घरकाम करण्यास पाळण्यात येणारा 'पाळीव प्राणी' बनली होती. हे स्त्री जन्मा या तुझ्या गुलामीच्या काळाला भेदण्यासाठी काही पुरुषच पुढे आले. महात्मा फुले यांनी स्त्रियांना शिकविण्यासाठी प्रथम आपल्या पत्नीला शिकविले. आगरकरांनी स्त्रियांचे हक्क सुधारकातून मांडले. महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी आश्रम काढले. महात्मा गांधी यांनी 'लेक वाचवा' असा संदेश दिला.

'स्त्री जन्म म्हणूनी न व्हावे उदास; असे संत जनाबाई म्हणतात ते खरेच आहे.

दि. ०३–०२–२०१७ ला वार्षिकोत्सवानिमि[त्त] वार्षिकोत्सव समिती तसेच महिला अध्ययन व सेवा के[ंद्र] यांच्या संयुक्त विद्यमाने रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्प[र्धा] तसेच पुष्पगुच्छ स्पर्धेचे आयोजन करण्यात आ[ले.] विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा हा यामा[गील] उद्देश आहे. रांगोळी स्पर्धेत कु. मेघा पिंपळ[कर] (बी कॉम. भाग १) हिने प्रथम क्रमांक मिळविला [तर] दुसरा क्रमांक मयुरी अलोणे हिने पटकाविला. पुष्पगु[च्छ] स्पर्धेत कु. विना भोयर हिने प्रथम क्रमांक मिळविला [तर] द्वितीय क्रमांक श्री. प्रदीप कापगते या विद्यार्थ्या[ने] मिळविला. पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. अश्वि[नी] बन्सोड हिने मिळविला तर द्वितीय क्रमांक कु. नितू [...] हिने मिळविला. या स्पर्धेत एकूण 60 विद्यार्थ्यांनी [भाग घेतला.]

[illegible]. 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण अधिनियम २०१३' या बाबत ॲड. साधना एम. येरणे, डॉ. मिलिंद येरणे, कॉलेज ऑफ लॉ, कोंढा–कोसरा, ता. पवनी, जि. भंडारा यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमात ॲड. संगिता गेडाम, कोंढा–कोसरा, महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा. डॉ. शिंदे सर तसेच प्रा. डॉ. शेंडे सर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक ॲड. साधना एम येरणे यांनी महिलांच्या लैंगिक छळाची विविध उदाहरणे देऊन महिला संरक्षणासाठी केलेल्या विविध कायदद्यांची माहिती देण्यात आली. दि. [illegible]–०२–२०१७ ला महिला अध्ययन व सेवा केंद्राअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी दान केलेल्या ब्लँकेट, कपडे, धान्य व पैसा इ. वस्तूंचे वितरण हिमांशी मतिमंद निवासी विद्यालय, भिवापूर येथे करण्यात आले. दि. २७–०२–२०१७ ला 'स्त्रिया व वर्तमानातील आव्हाने' या विषयावर डॉ. वर्षा गुप्ता यांचा मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महविद्यालयातील एकूण ५० विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. शिंदे सर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शिका म्हणून लाभलेल्या डॉ. गुप्ता मॅडम यांनी वर्तमान काळात स्त्रियांवर होत असलेला अन्याय, अत्याचार तसेच बलात्काराचे विविध प्रसंग वर्णन करून सांगितले. तसेच स्वतःच्या स्वानुभवावरुन विद्यार्थ्यांना काही टिप्सही दिल्या. यासोबतच त्यासंबंधी काही प्रात्यक्षिकांचे सादरीकरणही करण्यात आले. त्यावरुन वर्तमानातील आव्हाने कशी स्विकारावीत याविषयीची कल्पना विद्यार्थ्यांना मिळाली.

सत्राच्या शेवटी दि. १३ मार्च, २०१७ ला महिला अध्ययन व सेवा केंद्रा अंतर्गत एकूण ४७ विद्यार्थ्यांनी माहिती संकलन प्रकल्प तसेच राष्ट्रसंत संस्कार प्रकल्पाचे कार्य पूर्ण केले. अशाप्रकारे निरंतर प्रौढ शिक्षण व विस्तार विभागांतर्गत आलेल्या परिपत्रकाप्रमाणे तसेच परिपत्रकाशिवाय इतरही कार्यक्रम घेण्यात महिला अध्ययन व सेवा केंद्राला यश आले. या यशामागे महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. जॉर्ज सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. ए. व्ही. महावादीवार**
समिती सचिव
महिला अध्ययन व सेवा केंद्र





# लोकसंख्या शिक्षण मंडळ
## वार्षिक अहवाल - सत्र २०१६ - २०१७

भिवापूर महाविद्यालयामध्ये दरवर्षी प्रमाणे यावर्षी सत्र २०१६–१७ करीता लोकसंख्या शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. या सत्रामध्ये एकूण ६८ स्वयंसेवकांनी नोंदणी केली. दिनांक २०–०७–२०१६ ला "पाणी अडवा– पाणी जिरवा" व "हागणदारी मुक्त गांव" या विषयावर भिवापूर महाविद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. तसेच दि. २१–०७–२०१६ ला भिवापूर महाविद्यालयातर्फे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. तसेच दि. २१–०७–२०१६ ला भिवापूर महाविद्यालयातर्फे गावात जनजागृती दिंडी चे आयोजन करण्यात आले. नागपूर शाहीर मंडळी मार्फत 'जिचकार सभागृह भिवापूर येथे जनजागृतीव उदबोधन कार्यक्रम घेण्यात आला.महाविद्यालयाच्या लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या वतीने १२ ऑगस्ट २०१६ ला आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एड्स विषयी जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, ग्रामीण रुग्णालय भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. हिवरकर, डॉ. शिशीर गोस्वामी, डॉ. अश्विनी काळे, श्री. ओमप्रकाश पोटभरे, आरती झलके, प्रतिभा मरकाडे, श्री. साने यांनी एड्स या आजाराविषयी प्राथमिक माहिती व रोगापासून कसे संरक्षण करता येईल या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले गेले. महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. सुनिल शिंदे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष तर रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक २५–०९–२०१६ ला सकाळी ११.०० ते १.०० यावेळेत निबंध स्पर्धा 'बेटी, बचाव, बेटी पढाव', व 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' या विषयांवर घेण्यात आली. या निबंध स्पर्धेत एकूण 37 विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कु. स्नेहल राठोड हिने प्रथम क्रमांक पटकाविला तर कु. अश्विनी वाघमारे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. याशिवाय प्रोत्साहनपर क्रमांक कु. रचना नंदेश्वर हिला मिळाला.

दिनांक २६–०९–२०१६ ला 'मार्गदर्शन कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शक म्हणून मा. शिवाली देशपांडे (रिटायर्ड फ्लाईंग ऑफीसर,, प्रहार, नागपूर) यांनी 'स्त्रियांचे आत्मसंरक्षण–आजच्या काळाची गरज या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना, मुलींना स्व संरक्षण कसे करता येईल व राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करुन विद्यार्थ्यांमध्ये जोश निर्माण केला.

दिनांक २८–०९–२०१६ ला मोफत आरोग्य तपासणी शिबीर चे आयोजन ग्रामीण रुग्णालय भिवापूर व तालुका आरोग्य कार्यालय भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. शिशीर गोस्वामी, डॉ. अश्विनी काळे, डॉ. सोनाली दुधाट व त्यांचे सहकारी आरोग्य सेवक श्री. आर. व्ही. मांदळे, वाय. एस. मेश्राम, व्ही. एन. जांभळै, सौ. योगिता पांडे व औषधी निर्माता कु. मृणाली नागदेवे असे एकूण ९ लोकांनी सकाळी ११ ते १ ला सुमारे २६० विद्यार्थ्यांनी आपली आरोग्य तपासणी करुन औषधीचे वितरण करण्यात आले. दि. २९–०९–२०१६ ला मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमा अंतर्गत मार्गदर्शक मा. श्री. प्रशात सपाटे सचिव म.रा.अ.नि.स. व त्यांचे सहकारी मा. राजेश वानखेडे यांनी प्रात्यक्षिकासह अंधश्रद्धा निर्मूलन काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. या प्रसंगी तालुका अध्यक्ष (अनिस) श्री. पुरुषोत्तम भिसीकर व सचिव श्री साबीर शेख यांनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांमधून अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अनिस) ची कार्यकारिणी गठीत केल्या गेली.

दिनांक ०१–१०–२०१६ ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत व्यसनमुक्ती मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अनिकेत व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र उमरेड यांच्या संयुक्त विद्यमाने मा. श्री. इंद्रपाल गजघाटे प्रोजेक्ट डायरेक्टर मा. देविदास चपटे सल्लागार सौ. सुरेखा मेश्राम यांनी मार्गदर्शन केले.

दि. ०२–१०–२०१६ ला स्थानिक भिवापूर महाविद्यालयात जागतिक अहिंसा दिवस व स्वच्छ भारत, स्वस्थ भारत या निमित्त रॅलीचे व स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्य अर्पण करुन, दिंडीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात केली. भिवापूर महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या जागतिक अहिंसा दिन दिंडीत महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरीष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. बेटी बचाव, बेटी पढाव, स्वस्थ भारत, झाडे लावा, झाडे जगवा, शिकलेली आई घरादाराला पुढे नेई, दारुची नशा जीवनाची दुर्दशा अशा विविध घोषवाक्यांनी गावात जनजागरण करण्यात आले. दिंडीचा समारोप महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आला. तसेच त्यानंतर स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत महाविद्यालयातील परिसर व गावातील भिमादेवी परीसरातील जागेची साफसफाई करण्यात आली. अशाप्रकारे सप्ताह यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

दि. ०१–१२–२०१६ ला जागतिक एड्स दिन असल्यामुळे ग्रामीण रुग्णालय, अनिकेत बहुउद्देशीय संस्था, उमरेड द्वारा व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, लोकसंख्या शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गावातून एड्स रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात महाविद्यालयातून प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी हिरवी झेंडी देऊन करण्यात आले व येथून ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक डॉ. व्हि. टी. मस्के यांच्यासोबत गावातील चौका–चौकातून विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केली. गावातील चौका–चौका मध्ये विद्यार्थ्यांनी एड्स, पर्यावरण, स्वच्छता, सिकलसेल इत्यादीवर विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केली. जागतिक एड्स दिनानिमित्त्य रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. एड्स निर्मुलनावर व स्वच्छता यावर विविध घोषवाक्य आणि पर्यावरण व व्यसनमुक्ती वर 'झाडे लावा झाडे जगवा' 'शिकलेली आई घरादाराला पुढे नेई' , 'दारुची नशा जीवनाची दुर्दशा' अशा विविध घोषवाक्यांनी गावात जनजागरण करण्यात आले.रॅलीचा समारोप भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. याप्रसंगी अनिकेत व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र उमरेड चे अध्यक्ष सौ. माधुरीताई भिवगडे, श्री अजय साने, प्रोजेक्ट मॅनेजर सिकलसेल, श्री. इंद्रपाल गजघाटे, श्री. मंगेश निखार, श्री. देविदास चट्ये, ग्रामीण रुग्णालयातील श्री. डॉ. हिवरकर, डॉ. अश्विनी काळे, श्री. ओमप्रकाश पोटभरे, आरती झलके, प्रतिभा मरकाडे, श्री साने, तसेच प्रा. डॉ. विजय दिघोरे, प्रा. डॉ. सुनिल शिंदे, प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण, महाविद्यालयाचे लोकसंख्या शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. राहील कुरैशी, महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी पाहुण्यांनी एड्स या गंभीर आजारा संबंधी माहिती देऊन विद्यार्थ्यांना जागृत केले. व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. तसेच प्रा. डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून एड्स या विषयावर आजच्या तरुण वर्गाने गंभीरपणे पाहिले पाहिजे, तसेच या आजाराविषयी जनजागृती करुन समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले पाहिजे असे सांगितले. तसेच या आजाराविषयी प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या रॅलीमध्ये गावातील संपूर्ण डॉक्टर मंडळी व गावातील प्रतिष्ठित नागरीक सहभागी झाले होते.

भिवापूर महाविद्यालयाच्या लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता सिकलसेल तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा यांच्या माध्यमातून दिनांक १३ व १४ जानेवारी २०१७ ला श्री. अजय साने, प्रोजेक्ट मॅनेजर, सिकलसेल, डॉ. सोनाली दुधाट, आरोग्य अधिकारी यांनी सिकलसेल आजाराविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर वरील मंडळी व त्यांचे सहकारी आरोग्य सेवक श्री. आर. व्ही. मांदळे वाय.एस. मेश्राम, व्ही. एन. जांभळे, सौ. योगिता पांडे व औषधी निर्माता कु. मृणाली नागदेवे यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील एकूण २६१ विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ११ संशयित रुग्ण आढळून आले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे महाविद्यालयीनस्तरीय सत्र २०१६–१७ विशेष वार्षिक शिबीर दिनांक २२–०१–२०१७ ते २८–०१–२०१७ या कालावधीत अड्याळ पुनवर्सन, या दत्तक ग्रामी संपन्न झाले. या शिबीरा दरम्यान लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या वतीने दि. २६–०१–२०१७ ला दुपारच्या सत्रात २.३० वाजता व्सनाधीनता आणि आजची युवा पिढी या विषयावर प्रा. डॉ. गोपीचंद निंबार्ते, व्ही.एन.आय.टी., नागपूर यांचे व्याख्यान झाले. या मार्गदर्शनात त्यांनी सद्यःस्थितीत युवकांची व्यसनाधिनतेकडे असणारी ओढ याविषयी चिंता व्यक्त करुन त्यामुळे होणारे दुष्परिणाम सांगितले. सदर कार्यक्रमात मा. श्री. सुमीत माहुरे, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर हे उपस्थित होते.

दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ ला स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्य दानपेटी (आल्म बॉक्स) द्वारा साहित्य गोळा करण्याचे आयोजन करण्यात आले होते. मा. स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला उजाळा मिळावा म्हणून लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विविध स्वयंसेवी संस्थेच्या वतीने कपडे, ऊनी कपडे, ब्लँकेट, धान्य (तांदूळ, गहू, दाळ, पीठ ) इ. व पैसे गोळा करण्यात आले. पैश्यामधून बिस्कीटे, ब्लँकेट घेण्यात आले. आणि गोळा झालेल्या वस्तू व सर्व साहित्याचे दिनांक ११–०२–२०१७ ला आल्म बॉक्स द्वारा हिमांशी मतिमंद विद्यालय भिवापूर येथे डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसंख्या शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. राहील कुरैशी व विद्यार्थी स्वयंसेवक द्वारे मतीमंद मुलांना वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मागदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, डॉ. राजेश बहुरुपी, डॉ. अनिता महावादीवार इ. नी अथक परिश्रम घेतले.

निरंतर प्रौढ शिक्षण व विस्तार कार्यक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर च्या दिशा निर्देशानुसार लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या स्वयंसेवकांनी ५१ संशोधन प्रकल्प उपरोक्त नमूद कार्यालयाला सादर केले.



कार्यक्रम अधिकारी
**प्रा. डॉ. राहील कुरैशी**

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर
# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल २०१६-२०१७

०२ ऑक्टोबर १९६९ साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेची सुरूवात झाली. तेव्हापासूनच महाविद्यालयात ही योजना सुरू झाली. ४७ वर्षाची समृध्द परंपरा असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या नियमित उपक्रमांना दर मंगळवार व बुधवारच्या तासांना १ऑगस्ट पासून स्वयंसेवकांची आचारसंहिता, सेवाभाववृत्ती निर्माण करून युवक–युवतीना यात सहभागी करून घेण्यात येते, नियमित उपक्रमाअंतर्गत श्रमसंस्कार, आरोग्यसेवा, रक्तदान शिबीर, पर्यावरण जनजागृती, बौध्दिक, सांस्कृतिक व व्यक्तिमत्व विकासाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. दर मंगळवारी व बुधवारी दुपारी १. ०० ते २.३० या वेळात तास घेतले जातात.

**रासेयो नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा**

सत्रारंभी नव्याने सहभागी झालेल्या विद्यार्थ्या करीता नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमा विषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण तर माजी विद्यार्थ्यांचे उद्बोधन असा दुहेरी हेतू साधला जातो. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व, स्वयंसेवकांचे कर्तव्य व आचारसंहिता इत्यादी विषयीचे मार्गदर्शन मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी केले. प्रशिक्षणात माजी विद्यार्थ्यांचे अनुभव सांगून नवीन विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम केले जातात. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे व सहकार्यक्रम अधिकारी डॉ अनिता महावादीवार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची आचारसंहिता व त्यांचे महत्व विशद करून सांगितले व आतापर्यंत रासेयोची यशस्वी वाटचाल कशी झाली या संदर्भात सर्व इतिहास विद्यार्थ्यांसमोर ठेवला.

**ध्वजारोहण :**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज याच्या हस्ते ध्वजारोहण केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. यावेळी मा. प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता व व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

**आंतरराष्ट्रीय युवा दिन :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने १२ ऑगस्ट २०१६ ला आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एड्स विषयी जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने ग्रामीण रुग्णालय भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. हिवरकर, डॉ. शिषीर गोस्वामी, डॉ. अश्विनी काळे, श्री. ओमप्रकाश पोटभरे, आरती झलके, प्रतिभा मरकाडे, श्री. साने तसेच महाविद्यालयाचे रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, एड्स या रोगाविषयीच्या आजाराविषयी प्राथमिक माहिती व रोगापासून संरक्षण करता येईल या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**स्वच्छता पंधरवाडा ( १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट ) :**

राष्ट्रीय सेवा योजनाद्वारा स्वच्छता पंधरवाड्या अंतर्गत श्रमदानाचे कार्य करण्यात आले. या निमित्त दिनांक ३० ऑग २०१६ ला महाविद्यालयातील रा.से.यो. च्या स्वयंसेवकांना सर्वप्रथम स्वच्छतेविषयी शपथ देण्यात आली. त्यान महाविद्यालयीन परिसरात प्रशासकीय इमारतीपासून तर वर्गखोल्यापर्यंत स्वच्छता करण्यात आली. दि. ३१ ऑगस्ट, २०१६ भिवापूर येथील गावामध्ये ग्रामीण रुग्णालय तसेच गावातील मध्यवर्ती ठिकाण असलेले बसस्टॉप येथे स्वयंसेवकांनी स्वच्छ करुन गावातील जनतेत स्वच्छतेविषयीची जाणीव व जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**रासेयो वर्धापन दिन व युवावेध सप्ताह :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा ४७ वा वर्धापन युवकां अपार उत्साहात संपन्न झाला. त्याचबरोबर सत्र २०१६–२०१७ मध्ये भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे युवावेध सप्त २०१६ चे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताह निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

दिनांक **२४/०९/२०१६** ला युवावेध सप्ताह २०१६ चा **उद्घाटन सोहळा** उत्साहात संपन्न झाला. युवावेध सप्ताहाचे उद्घाटन मा. श्री. लहुजी जंनबंधु, नगरपंचायत अध्यक्ष, नगर पंचायत भिवापूर यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. विशेष अतिथी म्हणून मा. श्री. शंकर डडम नगरपंचायत उपाध्यक्ष, नगर पंचायत भिवापूर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. सुनिल शि डॉ. मोतीराज चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी मह यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी प्रास्ताविक युवावेध सप्ताहाच्या कार्यक्रमा विषयीची रूपरेषा सांगितली.

मा. श्री. लहुजी जनबंधु यांनी आपल्या भाषणात युवकांनी समाजा विषयीची बांधिलकी ठेवून आपले कर्तव्य पूर्ण करायचे तसेच आहे त्या परिस्थितीला सामोरे जाण्या विषयीचे योग्य उद्बोधन केले. उद्बोधना बरोबरच भिवापूर गावा काही समस्यांचेही चिंतन केले. तर मा. श्री. शंकर डडमल यांनी आपल्या भाषणातून युवकांना त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विक साधण्यासाठी सांस्कृतिक विकासाची गरज असल्याचा सल्ला दिला. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाष युवकांमध्ये जिद्द, चिकाटी असेल तर ते जीवनात ठरविलेले लक्ष्य निश्चितच गाठू शकतील ते समजून सांगण्या विविध विषयांचा आधार घेवून समजावून सांगितले. यासोबतच महाविद्यालयामध्ये ओपन लायब्ररी, महाविद्यालयाला I.S.O. आणि महाविद्यालयामध्ये M.Sc.. M.Com. मध्ये P.G. अभ्यासक्रम आणण्याचा मानस आहे. नँककरीता २०–२० मिशन र महाविद्यालयाच्या वर्तमान विकासाचाही आढावा घेतला.

या उद्घाटन सोहळ्याचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी केले तर राष्ट्रीय योजनेच्या साहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता महावादीवार यांनी आभार मानले.

दिनांक **२५/०९/२०१६** ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत 'निबंध स्पर्धा' 'बेटी बचाव, बेटी पढाव 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' या विषयावर घेण्यात आली. या निबंध स्पर्धेत एकूण ३७ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कु. राठोड हिने प्रथम क्रमांक पटकाविला तर कु. अश्विनी वाघमारे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या शिवाय प्रोत्साहनपर क्र कु. रचना नंदेश्वर हिला मिळाला.

**दि. २६–०९–२०१६** ला 'मार्गदर्शन कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शक म्हणून मा. शि देशपांडे (रिटायर्ड फ्लाईंग ऑफिसर, प्रहार, नागपूर) यांनी 'स्त्रियांचे आत्मसंरक्षण–आजच्या काळाची गरज' या विषय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मुलींना स्वसंरक्षण कसे करता येईल व राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करुन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला.

दिनांक २७/०९/२०१६ ला **'श्रमसंस्कार कार्यक्रमाचे** आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालय व आसपासच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज तसेच प्राध्यापक वृंद, रासेयोचे सर्व विद्यार्थी या श्रमसंस्कार कार्यक्रमात सहभागी झाले होते.

दिनांक २८/०९/२०१६ **ला 'मोफत आरोग्य तपासणी शिबीर'** चे आयोजन ग्रामीण रुग्णालय भिवापूर व तालुका आरोग्य कार्यालय, भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. शिशीर गोस्वामी, डॉ. अश्विनी काळे, डॉ. सोनाली दुधाट व त्यांचे सहकारी आरोग्य सेवक श्री. आर. व्हि. मांदळे, वाय. एस. मेश्राम, व्हि. एन. जांभळे, सौ. योगिता पांडे व औषधी निर्माता कु. मृणाली नागदेवे असे एकूण ०९ लोकांनी सकाळी ११.०० ते १.०० ला सुमारे २६० विद्यार्थ्यांनी आपले आरोग्य तपासणी करुन औषधीचे वितरण करण्यात आले.

**दिनांक** २९/०९/२०१६ 'मार्गदर्शन कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. 'अंधश्रद्धा निर्मूलन' कार्यक्रमा अंतर्गत मार्गदर्शन मा. श्री. प्रशांत सपाटे, सचिव, म.रा.अ.नि. स. व त्यांचे सहकारी मा. राजेश वानखेडे यांनी प्रात्यक्षिकासह अंधश्रद्धा निर्मुलन काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. या प्रसंगी तालुका अध्यक्ष (अनिस) श्री. पुरुषोत्तम श्रिसीकर व सचिव श्री. शाबीर शेख यांनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांमधून अनिस ची कार्यकारिणी गठित केल्या गेली.

**दिनांक ३०–०९–२०१६** ला 'रस्ता सुरक्षा अभियान' या विषयावर पोष्टर स्पर्धा घेण्यात आली. पोष्टर स्पर्धेत एकूण २३ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सहभागी विद्यार्थ्यांमधून श्री. उज्वल खानोरकर बी.एस.सी. भाग–१ यांचा प्रथम क्रमांक आला.

**दिनांक ३१ ऑक्टोबर २०१६** ला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' चे आयोजन करण्यात आले. या निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. के. शिंदे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मापासून तर त्यांच्या कार्यापर्यंतची संपूर्ण उजळणी स्वयंसेवकांना करुन दिली. त्यातूनच त्यांच्या लोहपुरुषांच्या अस्तित्वाची जाणीव करुन दिली. यांप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी केले. संचालन प्रा. वासेकर यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. राजेश बहुरुपी यांनी मानले.

दिनांक ०१/१०/२०१६ ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत व्यसनमुक्ती मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अनिकेत व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र, उमरेड यांच्या संयुक्त विद्यमाने मा. श्री. इंद्रपाल सवाटे, प्रोजेक्ट डायरेक्टर, मा. देविदासजी चट्टे सल्लागार, सौ. सुरेखा मेश्राम यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक ०२/१०/२०१६ ला स्थानिक भिवापूर महाद्यिालयात **'जागतिक अहिंसा दिन व 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' या निमित्त रॅलीचे व स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.** महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिंडीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरूवात केली. भिवापूर महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या जागतिक अहिंसा दिन दिंडीत महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. 'बेटी बचाव, बेटी पढाव', 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' 'झाडे लावा झाडे जगवा',' शिकलेली आई घरादाराला पुढे नेई'. 'दारूची नशा जीवनाची दुर्दशा' अशा विविध घोष वाक्यांनी गावात जनजागरण करण्यात आले. दिंडीचा समारोप महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आला. व तसेच त्यानंतर त्यानंतर स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत महाविद्यालयातील परिसर व गावातील भिवादेवी परिसरातील जागेची साफसफाई करण्यात आली. अशाप्रकारे सप्ताह यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रासेयोच्या स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

**संविधान दिवस :**

दि. २६ नोव्हेंबर २०१६ ला संविधान सप्ताहानिमित्त दु. १२.०० वाजात सर्वप्रथम संविधान प्रास्ताविकेचे सामुहिकरित्या वाचन करण्यात आले. यात महाविद्यालयातील शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

यानंतर रा. से. योजनेद्वारा 'शांतता व सुव्यवस्थेसाठी संविधानाची गरज' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले सदर निबंध स्पर्धेत एकूण ४५ स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धेत बी.ए. भाग १ मधील कु. प्रणाली वाघमारे हिने प्रथम क्रमांक पटकाविला तर द्वितीय क्रमांक बी कॉम भाग २ मधील श्री. प्रफुल्ल फोफसे यांनी पटकविला.

**जागतिक एड्स दिन :**

दुसऱ्या सत्रात ०१/१२/२०१६ ला जागतिक एड्स दिन असल्यांमुळे ग्रामीण रूग्णालय, अनिकेत बहुउद्देशीय संस्था उमरेड द्वारा व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, लोकसंख्या शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गावातून एड्स रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात महाविद्यालयातून प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी हिरवी झेंडी देऊन करण्यात आले व येथून ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकिय अधिक्षक डॉ. व्हि. टी. मस्के यांच्यासोबत गावातील चौका–चौकातून विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केली. गावातील चौका–चौका मध्ये विद्यार्थ्यांनी एड्स, पर्यावरण व स्वच्छता, सिकलसेल इ. वर पथनाट्य सादर केली. जागतिक एड्स दिनानिमित्त्य रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. एड्स निर्मूलनावर व स्वच्छतावर विविध घोषवाक्य आणि पर्यावरण व व्यसनमुक्तीवर 'झाडे लावा झाडे जगवा',' शिकलेली आई घरादाराला पुढे नेई'. 'दारूचा नशा जीवनाची दुर्दशा' अशा विविध घोष वाक्यांनी गावात जनजागरण करण्यात आले. रॅलीचा समारोप भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. याप्रसंगी अनिकेत व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र उमरेड चे अध्यक्ष सौ. माधुरीताई देवगडे, श्री अजय साने प्रोजेक्ट मॅनेजर सिकलसेल, श्री. इंद्रपाल गजघाटे, श्री. मंगेश निखार, श्री. देविदास चट्ये, ग्रमीण रुग्णालयातील श्री. डॉ. हिवरकर, डॉ. अश्विनी काळे, श्री. ओमप्रकाश पोटभरे, आरती झलके, प्रतिभा मरकाडे, श्री. साने, तसेच महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, प्रा. डॉ. सुनिल शिंदे, प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण, प्रा. डॉ. राहील कुरैशी महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी पाहुण्यांनी एड्स या गंभीर आजारा संबंधी माहिती देऊन विद्यार्थ्यांना जागृत केले व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. तसेच डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून एड्स या विषयावर आजच्या तरुण वर्गाने गांभीर्याने पाहिले पाहिजे तसेच या आजाराविषयी जनजागृती करुन समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले पाहिजे असे सांगितले. तसेच या आजाराविषयी प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या रॅलीमध्ये गावातील संपूर्ण डॉक्टर मंडळी व गावातील प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले होते,

**सिकलसेल तपासणी शिबीर :**

भिवापूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातुन महाविद्यालयातील विद्यार्थ्याकरीता सिकलसेल तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा यांच्या माध्यमातुन दिनांक १३ व १४ जानेवारी २०१७ ला श्री. अजय साने प्रोजेक्ट मॅनेजर, सिकलसेल, डॉ. सोनाली दुधाट, आरोग्य अधिकारी यांनी सिकलसेल आजाराविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर वरील मंडळी व त्यांचे सहकारी आरोग्य सेवक श्री आर. व्हि. मांदळे, वाय. एस. मेश्राम, व्हि. एन. जांभळे, सौ. योगिता पांडे व औषधी निर्माता कु. मृणाली नागदेवे यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील एकूण २६१ विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ११ संशयित रुग्ण आढळून आले.

**राज्यस्तरीय शिबीरामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग :** महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक १) श्री. गोपाल आर पाटील, बी.ए. भाग ३ २) श्री. प्रफुल व्ही. फोफसे बी. कॉम. भाग २ ३) श्री. सुमीत बी. बोरकर, बी.कॉम. भाग २, ४) कु. शिवानी वामन गायमुखे, बी.कॉम. भाग २

५) कु. काजल बलदेव वासनिक बी कॉम भाग २ ६) कु. कोमल मुकुंदा गायमुखे असे एकूण ६ विद्यार्थी शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी मोरगांव जि. गोंदिया यांनी मौजा बोंडगाव देवी ता. अर्जुनी मो. जि. गांदिया येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीर ग्रामोन्नतीकरीता युवाशक्ती दिनांक ०९ जानेवारी ते १५ जानेवारी २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीरात उस्फुर्त सहभाग घेतला.

**स्वच्छ – स्वस्थ भारताकरिता युवाशक्ती' विशेष वार्षिक शिबीर**
**दत्तक ग्राम – अड्याळ (पुनर्वसन)**

भिवापूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे महाविद्यालयीन सत्र २०१६–१७ विशेष वार्षिक शिबीर दिनांक २२/०१/२०१७ ते २८/०१/२०१७ या कालावधीत अड्याळ (पुनर्वसन) येथे संपन्न झाले. या सात दिवर्सीय विशेष शिबिराची पूर्वतयारी दिनांक २२/०१/२०१७ पासून करण्यात आली. याच दिवशी महाविद्यालयाचे रा.से.यो. चे स्वंयसेवक हे शिबीरस्थळी उपस्थित झाले. शिबिरात एकूण ७५ स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी शिबिरातील विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करण्यात आले. व शिबिराच्या पुढील कार्यक्रमाचेही नियोजन करण्यात आले. शिबिर प्रमुख प्रा. डॉ. विजय दिघोरे व प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांच्या नेतृत्वात व सहकारी प्राध्यापक यांच्या सहकार्याने शिबीर कालावधीत अनेक समाजाभिमुख कार्यक्रम व प्रकल्प राबविण्यात आले.

दिनांक २३.०१.२०१७ ला महाविद्यालयीन विशेष शिबिराचा उद्‌घाटन सोहळा असल्याने नियोजित वेळेनुसार रा.से.यो.चे स्वयंसेवक उद्‌घाटन सोहळ्याच्या कामाला लागले. शिबिराचे उद्‌घाटन मा. श्री. दिलीपजी गुप्ता (सामाजिक कार्यकर्ता भिवापूर) यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व विशेष अतिथी म्हणून मा. श्रीमती मंगला विजय तांबे (सरपंच, ग्रामपंचायत अड्याळ), प्रमुख अतिथी महणून मा. श्री. रंगराव र. भोयर (अध्यक्ष, शाळा समिती अड्याळ), मा. श्री. वसंतजी गायकवाड (उपसरपंच, ग्रमपंचायत अड्याळ), मा. श्री. आर.डी. शेटे (मुख्याध्यापक, जि. प. उच्च प्राथमिक शाळा अड्याळ), तसेच श्री. सुरज ठाकरे (सदस्य, ग्रामपंचायत अड्याळ) इ. उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. सुनिल शिंदे, प्रा. किशोर शेंडे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना ध्वजारोहणाचा कार्यक्रम श्रीमती मंगला विजय तांबे (सरपंच, ग्रमपंचायत अड्याळ) यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. या उद्‌घाटन प्रसंगी व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी केले. संचालन सह. कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता महावादीवार तर कार्यक्रमाचे आभार प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी मानले.

या दिवशी रात्री रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी गावकऱ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी दिली. तसेच दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाचे नियोजनही करण्यात आले.

दिनांक– २४/०१/२०१७

सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगा, प्राणायम आटोपून सकाळी ७.१५ वाजता जनजागरण दिंडी काढण्यात आली. या दिंडीच्या माध्यमातून अड्याळ येथील जनतेला 'पर्यावरण', 'व्यसनमुक्ती', 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' तसेच स्वच्छ व स्वस्थ भारताविषयीच्या विविध घोषणा देऊन जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली. जनजागरण दिंडीनंतर विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून जि. प. उच्च प्राथमिक शाळा, अड्याळ येथील परिसर स्वच्छ केला.

दुपारच्या सत्रात २.३० वाजता **'कृषी आणि शासकीय योजना'** या विषयावर मा. श्री. गणेश राम
(तालुका कृषी अधिकारी, भिवापूर) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात शिवकालीन तलाव ते कोल्हापुरी ब
पर्यंतची विविध उदाहरणे सांगून त्यांचा कृषीसाठी कसा उपयोग होत गेला हे सांगून शासनाच्या कृषीसाठी असणाऱ्या वि
योजनांची माहिती येथील गावकरी तसेच स्वयंसेवकांना दिली.

संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात रा.से.यो. स्वयंसेवकांनी पर्यावरण तसेच स्वच्छ व स्वस्थ भारत या मध्य
संकल्पनेच्या आधारावर कार्यक्रम सादर केलेत.

**दिनांक–२५/०१/२०१७**

सकाळी ६.०० वाजता प्रार्थना आटोपून ६.३० वाजता महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. आ
सारवे यांनी रा.से.यो. च्या स्वयंसेवकांना प्राणायाम व योगा विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर अल्पोपहार आटोपून श्रमद
काम हाती घेतले. श्रमदानासाठी विविध ग्रुप तयार करून प्रत्येक ग्रुपला विविध परिसर श्रमदानासाठी देण्यात आला. अड्
गावात ज्या कुटुंबातील लोकांकडे शौचालय नाही अशा कुटुंबांना काही ग्रुपने भेटी देऊन त्यांना निरोगी आरोग्याचे महत्त्व प
दिले. त्यामध्ये १) श्री. रमेश मारोती भिवनकर २) श्री. सखाराम देशमुख ३) श्री. प्रमोद धनराज ठाकरे ४) श्री. कलावती ब
देशमुख ५) श्री. गौतम रामजी नगरारे ६) श्री. मोरेश्वर रुषी कुडेगावे यांच्या घरी शौचालयाचे खड्डे करण्यासही घरातील लो
मदत केली. वरील सहा शौचालयाचे खड्डे पूर्ण करण्यात आले तर काही ग्रुपने श्रमदानाचे वेगळ्या स्वरुपाचे कामे हाती घेत
त्यात वृक्षारोपण, वृक्षांना कठडे लावणे, नालीचे खोदकाम, नालीसफाई, कचरा निर्मूलन, गाजरगावत निर्मूलन इत्यादी का
रासेयोच्या स्वयंसेवकांनी केली.

दुपारच्या सत्रात २.३० वाजता **'महिला व बालआरोग्य मोफत तपासणी शिबीर'** पार पडले. सदर शिबिरा
प्रारंभी प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. बोडके यांनी मलेरिया, फायलेरिया यासारख्या रो
माहिती दिली. त्यानंतर आरोग्य तपासणीला प्रारंभ केला. शिबिरात उपस्थित स्वयंसेवक तसेच गावातील महिला व बालक
आरोग्याची तपासणी करण्यात आली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा येथील संपूर्ण चमू त
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार तसेच स
प्रा. डॉ. राजेश बहुरुपी, प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी मोलाचे योगदान दिले.

याच दिवशी दुपारच्याच सत्रात ३.३० वाजता २५ जाने. २०१७ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिवस' आणि 'घ
अत्याचारापासून महिलांचे संरक्षण' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात विविध वक्त्यांनी वि
ा कायद्यांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्वप्रथम ॲड. पिंपळकर यांनी 'रॅगिंग व महाविद्यालयीन विद्यार्थी
विषयावर मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शनात कायद्यातील विविध तरतुदींची माहिती देण्यात आली. ॲड. मांडवकर यांनी 'साय
कायदा' याविषयी मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शनात त्यांनी दिवसेंदिवस मोबाईलच्या वाढत्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त के
विशेषतः युवकांमध्ये ही जागृतता येण्यासाठी त्यांनी सायबर क्राईमची माहिती दिली. ॲड. नागोसे यांनी 'हुंडा प्रतिबंधक का
तसेच घरगुती अत्याचार अधिनियम २००५' याविषयी माहिती दिली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विविध घडलेल्या गुन्ह्य
माहिती देऊन कायदे समजावून सांगितले. मा. श्री. नरहरी पेंदाम, सामाजिक कार्यकर्ते यांनी 'भारताची घटना व संविधान'
विषयावर भर देवून अस्पृश्यता, जातीभेद इ. ची माहिती देवून समाजात सर्वधर्म समभावाची भावना कशी जागृत व्हायला पा
याविषयीचे महत्त्व पटवून दिले. यानंतर भिवापूर येथील दिवाणी न्यायाधीश मा.श्री.एस.ए. खलाने यांनी वकील नस
आर्गुमेंट्स कसे केले जातात हे पटवून सांगण्यासाठी मुखर्जी तसेच महात्मा गांधींच्या खटल्यांची विस्तृतपणे माहिती दे
कायद्यांतील बारकावे समजावून सांगितले. भिवापूर तहसील कार्यालय येथील नायब तहसिलदार मा. श्रीमती चैताली द

यांनी 'लोकशाही बळकटीसाठी मतदानाची आवश्यकता' आणि 'महसूल संदर्भातील कायदे' विषयक माहिती दिली. यासोबतच मतदार दिवसाचे औचित्य साधून ' ७ व्या राष्ट्रीय मतदार दिवस' च्या निमित्ताने स्वयंसेवक तसेच गावातील उपस्थित नागरिकांना मजबूत लोकशाहीच्या पायासाठी मतदानाचे महत्व पटवून दिले आणि स्वयंसेवक व गावातील लोकांना 'मतदार जागृती कार्यक्रम' घेण्यात आला. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी मा. श्री. राठोड (सरकारी अभियोक्ता), मा. श्री. लिखार साहेब (पंचायत समिती, भिवापूर), मा. श्री. बरडे, मा. श्री. दाणी, श्रीमती भुरे, मा. श्री. रघुते साहेब इ. मान्यवर उपस्थित होते. संध्याकाळी प्रार्थनेनंतर स्वयंसेवकांसाठी विविध बौध्दिक खेळांचे आयोजन करण्यात आले.

**दिनांक–२६/०१/२०१७**

नेहमीप्रमाणेच स्वयंसेवकांनी प्रात:विधी आटोपून सकाळी ६.०० वाजता प्रार्थना केली. ६.३० वाजता स्वयंसेवकांनी प्राणायम व योगासने केल्यानंतर जिल्हा परिषद उच्च प्रा. शाळा, अड्याळ येथील पटांगणावर होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमात आपली उपस्थिती दर्शविली. शाळेतील ध्वजारोहण कार्यक्रमा नंतर तेथील सांस्कृतिक कार्यक्रमातही विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध नृत्य व नकलांचे सादरीकरण केले.

दुपारच्या सत्रात २.३० वाजता 'व्यसनाधिनता आणि आजची युवापिढी' या विषयावर प्रा. डॉ. गोपीचंद निंबार्ते, व्ही.एन.आय.टी. नागपूर यांचे व्याख्यान झाले. या मार्गदर्शनात त्यांनी सद्य:स्थितीत युवकांची व्यसनाधिनतेकडे असणारी ओढ याविषयी चिंता व्यक्त करुन त्यामुळे होणारे दुष्परिणाम सांगितले.सदर कार्यक्रमात मा. श्री. सुमीत माहुरे, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर हेही उपस्थित होते. कार्यक्रमानंतर ५.०० ते ६.०० या वेळात विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञानावर आधारित 'लेखी परीक्षा' घेण्यात आली. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या स्वयंसेवकाला समारोपीय कार्यक्रमात पारितोषिक देण्यात आले.

**दिनांक–२७/०१/२०१७**

सकाळी ६.०० वाजता स्वयंसेवकांनी प्रात:विधी आटोपून प्रार्थना केली. ६.३० वाजता स्वयंसेवकांनी प्राणायाम व योगासने केल्यानंतर काही ग्रुपच्या स्वयंसेवकांनी गावातील श्रमदानाचे अपूर्ण काम पूर्ण केले. तर काही ग्रुपने समारोपीय कार्यक्रमासाठी शाळेतील परिसर स्वच्छ करुन श्रमदानाच्या कार्यात सहभाग घेतला. श्रमदानानंतर स्वयंसेवकांनी समारोपीय कार्यक्रमाची तयारी केली.

दुपारी २.०० वाजता समारोपीय कार्यक्रमाची सुरुवात झाली. शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस स्टेशन भिवापूर येथील ठाणेदार मा. श्री. रविंद्रजी दुबे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनापासूनच दुसऱ्यांसाठी जगतांना कसे आत्मसमाधान होते हे त्यांच्या जीवनांत आलेल्या विविध प्रसंगाचे वर्णन करुन समजावून सांगितले. या कार्यक्रमा प्रसंगी सम्यक ग्रुप ला प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते पारितोषिक वितरीत करण्यात आले. शिबीरा दरम्यान श्री. आदेश चंद्रमणीजी मेश्राम यांना उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून तसेच कु. शिवानी वामनजी गायमुखे हिला उत्कृष्ट स्वयंसेविका म्हणून घोषित करण्यात येऊन त्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच शिबीर कालावधीत पार पडलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट अभिनयासाठी कु. प्रिती केशवजी राठोड हिला तसेच श्री. सुमीत भोजराज बोरकर या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. बौद्धिक स्पर्धेत नंबर गेम्स स्पर्धा घेण्यात आली. श्री. अंकेश फुलचंद रेहपाडे या विद्यार्थ्याला आलेल्या मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देऊन गोरविण्यात आले. सामान्य ज्ञानावर आधारीत घेण्यात आलेल्या परीक्षेत कु. रुत जकरिया हिला भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी श्री. जगदिश प्रभूजी मालोदे, कु. कोमल गायमुखे तसेच कु. काजल कृष्णाजी पडोळे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक कार्यक्रम

अधिकारी डॉ. अनिता महावादीवार यांनी केले. तर अहवाल वाचन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी केले. सरते शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी मानले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रासेयोच्या सर्व विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न केले.

**रा.से.यो. चा विस्तार उपक्रमात सहभाग :**

दि. ११ फेब्रुवारी २०१७ ला स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या ८६ व्या जयंती निमित्त्य दान पेटी (आल्म बॉक्स) द्वारा साहित्य गोळा करण्याचे आयोजन करण्यात आले होते. मा. स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला उजाळा मिळावा म्हणून राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विविध स्वयंसेवी संस्थेच्या वतीने कपडे, उनी कपडे, ब्लँकेट, धान्य (तांदूळ, दाळ, गहू, पीठ इ.) व पैसे गोळा करण्यात आले. पैश्यामधून बिस्कीटे, ब्लँकेट घेण्यात आले. आणि गोळा झालेल्या वस्तू व सर्व साहित्याचे दिनांक ११–०२–२०१७ ला आल्म बॉक्स द्वारा हिमांशु मतिमंद विद्यालय, भिवापूर येथे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादिवार व विद्यार्थी स्वयंसेवक द्वारे मतिमंद मुलांना वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, डॉ. राहिल कुरैशी, डॉ. राजेश बहुरुपी, डॉ. महावादिवार इ.नी अथक परिश्रम घेतले.

भिवापूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाची वाढती यशस्वीता ही उल्लेखनीय बाब समजावी लागेल. याचे सर्व श्रेय संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. भाऊसाहेब मुळक, संस्थेचे नवनियुक्त अध्यक्षा श्रीमती सुमनमाला मुळक, संस्थेचे सचिव मा. माजी नामदार राजेंद्रजी मुळक (राज्यमंत्री), मा. डी. के. महाडिक, संस्थेच्या मॅनेजींग डायरेक्टर श्रीमती प्रेरणाताई मुळक, व्यवस्थापन मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व रा.से.यो. च्या सर्व लोकांना जाते. या सर्वांनी ज्या आत्मीयतेने सहकार्य केले त्यांचा मी सदैव ऋणी राहीन. त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जी धडपड दाखविली आणि कार्यक्रम यशस्वी केले त्याबददल मी सर्वाचा मन:पूर्वक आभारी आहे.

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
**प्रा. डॉ. विजय दिघोरे**

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर
## शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग
## सत्र २०१६-१७

बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला रोड, नागपूरद्वारा संचालित भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथील विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासाकरीता नेहमीच खेळाडूंना प्रोत्साहन देत आला आहे. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार आणि त्यांच्या मधील क्षमतेनुसार भिवापूर महाविद्यालय खेळाडूंच्या विकासाकरीता नेहमीच मार्गदर्शक म्हणून पाठीशी राहिला आहे.

सत्र २०१६–१७ च्या सुरूवातीला शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाची सर्वसाधारण सभेमध्ये महाविद्यालयाद्वारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमधील भाग घ्यावयाच्या क्रीडा प्रकारांची निवड करण्यात येवून कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल, ऐथलॅटिक्स या प्रकारांमध्ये प्रवेश निश्चित करण्यात आला.

या सत्रामध्ये भिवापूर कनिष्ठ महाविद्यालयाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे आयोजित १९ वर्षाखालील कबड्डी, खो–खो,ऐथलॅटिक्स, बॅडमिंटन, कुश्ती आणि बुदिधबळ स्पर्धेकरीता प्रवेश निश्चित केला.

१५ ऑगस्ट २०१६ ला स्वातंत्र्याच्या ७० व्या वर्धापन दिनानिमीत्त आणि २६ जानेवारी २०१७ ला भारतीय गणतंत्राच्या ६७ व्या गणतंत्र दिवसानिमित्त भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते ध्वजारोहनाचा कार्यक्रम पार पडला. ह्या प्रसंगी भिवापूर मधील गणमान्य नागरीक, महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक वृंद, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर लगेच **DE- ADDICTION COMMITTEE** द्वारे उपस्थितांनी पान, तंवाखू, गुटखा, दारू, सिगारेट वा अन्य व्यसन करणार नाही अशी शपथ घेतली.

विद्यार्थ्यांमधील मानसिक क्षीण दूर होऊन त्यांच्यामधील उत्साह कायम रहावा या हेतूने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. ह्या वार्षिक स्पर्धेमध्ये कबड्डी, खो–खो, व्हॉलिबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, टेबल–टेनिस, मैदानी स्पर्धा, चॉकलेट स्पर्धा, तीन पायांची दौड स्पर्धा, पोता दौड स्पर्धा, चमचा–लिंबू आणि मि. भिवापूर महाविद्यालय स्पर्धांचे आयोजन केले गेले होते. बी. ए. भाग १ चा विद्यार्थी करण मेश्राम याची मि. भिवापूर महाविद्यालय म्हणून निवड करण्यात आली. विविध स्पर्धांमधील विजयी आणि उपविजयी खेळाडूंना पदक देवून गौरव करण्यात आले.

वार्षिकोत्सवाच्या कार्यक्रमामध्ये रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल संघाचे अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केलेल्या B.Sc. II ची विद्यार्थीनी कु. सोनाली श्रावण बोरकर हिचा Track Suit आणि स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीद्वारे संचलित स्वर्गीय भाऊसाहेब मुळक स्पोर्ट्स ॲकेडमी आणि भिवापूर महाविद्यालय, भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या स्वर्गीय भाऊसाहेब मुळक विदर्भस्तरीय खुल्या कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन दि. १८ आणि १९ नोव्हेंबर २०१६ ला करण्यात आले होते. १७ नामांकित संघांचा सहभाग असलेल्या बाद फेरीच्या स्पर्धेत जिमखाना, नागपूर संघानी अजिंक्यपद प्राप्त केले तर सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालयाच्या संघानी द्वितीय स्थान प्राप्त केले.

भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे दिनांक २८–०९–२०१६ ला डॉ. दुधाट, डॉ. गोस्वामी आणि प्राथमिक आरोग्य केन्द्र, सोमनाळा येथील वैद्यकिय चमुने महाविद्यालयीन विद्यार्थी –विद्यार्थीनींची आरोग्य तपासणी करून निशुल्क औषधांचे वाटप केले. तसेच दिनांक १०–१२–२०१६ ला राष्ट्रिय आरोग्य अभियानार्गत सिकलसेल तपासणी शिबीराचे आयोजन केले होते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि अनुशासनसद्वारे त्यांच्यातील वाईट प्रवृत्तींना दूर सारण्याकरीता महाविद्यालयातील Discipline Committee De Addiction Committee द्वारे आकस्मित मोबाईल आणि तंबाखूजन्य तपासणी मोहिम संपूर्ण वर्षभर राबविली गेली. दोषी विद्यार्थ्यांच्या पालकांना बोलवून त्यांच्या समोर विद्यार्थ्यांनी चुकी मंजूर केल्यावर त्यांना तंबी देवून त्यांचे नेहमी मार्गदर्शन केले गेले.

आमच्या क्रीडा विभागाला बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला रोड नागपूरचे सन्माननिय सचिव मा. श्री. राजेन्द्रबाबू मुळक साहेब, मा. अध्यक्षा श्रीमती सुमनमाला मुळक मॅडम, मा. कोषाध्यक्ष मा. श्री. यशराजजी मुळक साहेब यांच्या मार्गदर्शनामध्ये भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज सर यांच्या मार्गदर्शनसमध्ये विद्यार्थ्यांना अनेक खेळांच्या सुविधा देवून प्रोत्साहित केले जाते. तसेच आमच्या क्रीडा विभागाला भिवापूर महाविद्यालय येथील सर्व सन्माननिय प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यावर वाटचाल सुरू आहे.

प्रा. आदित्य सारवे
शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग प्रमुख













...तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा सत्र २०१५-२०१६ चा
महाविद्यालयाच्या निर्धार वार्षिकांकाचा उत्तेजनार्थ पुरस्कार
मा. कुलगुरू डॉ. सिद्धार्थविनायक काणे यांच्या कडून स्विकारतांना
प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व डॉ. मधुकर नंदनवार





U.G.C. Sponsored One Day National Seminar
'Human Rights of the Subjugated'



...साहेब मुळक स्पोर्टस् ॲकेडमी आणि भिवापूर महाविद्यालय
भिवापूर तर्फे कबड्डी क्रीडा स्पर्धेचा पुरस्कार प्रदान करतांना
...ॲकेडमीचे सचिव, संस्थेचे कोषाध्यक्ष मा. यशराज मुळक



Unveiling of the Conference Proceedings during National Seminar on "English Studies in a Transnational Environment : Society, Culture and Language".




...भारतीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेतील उपविजयी.
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ व्हॉलीबॉल संघात समावेश



Dr. Siddharthvinayaka Kane, Hon'ble Vice Chancellor of RashtrasantTukkojiMaharaj Nagpur University Nagpur, Dr. Mrs. Shiva KanujiaSukula, Deputy Library, Jawaharlal University, New Delhi And Other Guest At The Seminar





भिवापूर महाविद्यालय



